

पनवेल : दिवाळीनिमित्त महापालिका आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने वडाळे तलाव येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी 'आरएसएस'ला १०० वर्षे पूर्ण झाल्याबद्दलही विशेष कार्यक्रम झाला तसेच हॅप्पी स्ट्रीटचेही उद्घाटन झाले.

रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ९३
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ सोमवार, २० ऑक्टोबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

वंचित व्यक्तींच्या विकासासाठी शासनाचे प्रयत्न -मुख्यमंत्री/२
'मिडलक्लास सोसायटी विविध उपक्रमांचे केंद्र बनतेय'/३
श्रीवर्धन तालुका पर्यटकांच्या प्रतीक्षेत/७

# सर्वसामान्यांच्या समस्या सोडविण्यासाठी भाजप कटिबद्ध –मंत्री आशिष शेलार

## उरणमध्ये कार्यकर्ता मेळावा आणि पक्षप्रवेश

**उरण : वार्ताहर**

भारतीय जनता पक्ष सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध आहे. सर्व समस्यांची सोडवणूक करण्याची जबाबदारी भाजपची राहील, अशी ग्वाही राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी उरणमध्ये कार्यकर्ता मेळावा आणि पक्ष प्रवेशावेळी दिली

पनवेल आणि उरण मतदार संघात भारतीय जनता पक्षाची ताकद दिवसेंदिवस वाढत आहे. पक्षाच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या विकास कामांवर आणि सर्वांगीण विकासाचा दृष्टीकोन समोर ठेऊन काम करणाऱ्या सक्षम नेतृत्वावर विश्वास ठेऊन अनेक पक्षच पदाधिकारी आणि कार्यकर्ते भारतीय जनता पक्षामध्ये सामील होत आहेत. त्यानुसार काँग्रेस पक्षाचे माजी सरपंच राजेंद्र ठाकूर, माजी सरपंच हेमांगी ठाकूर, उबाठा गटाचे माजी सरपंच दीपेश कोळी, माजी सरपंच नंदकुमार पाटील, माजी सरपंच भावना पाटील, माजी उपसरपंच नंदकुमार म्हात्रे यांच्यासह अनेक ग्रामपंचायतीमधील




सदस्यांनी तसेच कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला.

या सर्व प्रवेश कर्त्यांचे स्वागत मंत्री आशिष शेलार, आमदार महेश बालदी, भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी केले. या कार्यक्रमाला आमदार महेश बालदी, भाजपचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य रवी भोईर, चंद्रकांत घरत, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष जसीम ग्यास, विभाग अध्यक्ष जितेंद्र घरत, उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, पनवेल पश्चिम मंडळ अध्यक्ष रुपेश धुमाळ, उरण तालुका शहर मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर, उरण तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, माजी नगरसेवक राजेश ठाकूर, माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे, उपाध्यक्ष संगीता पाटील, उरण शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील, उरण तालुका मंडळ महिला अध्यक्ष संपूर्णा थळी, उरण तालुका भाजप सरचिटणीस सुनील पाटील, हितेश शाह, मनोहर सहतिया, माजी नगरसेविका जान्हवी पंडित, मनन पटेल, अजित भिंडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी मंत्री शेलार यांनी सांगितले की नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी, तसेच विशेषत: प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी आमदार महेश बालदी हे नेहमीच पुढाकार घेतात. सर्वसामान्य नागरिकांची, तसेच सर्व गावांतील ग्रामपंचायतींची सर्व दु:ख आणि समस्या आजपासून भाजपची आणि आमची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन केले.

मी संपर्कमंत्री म्हणून तुमची प्रत्येक समस्या शासनापर्यंत, तसेच अर्थमंत्र्यांपर्यंत आणि संबंधित मंत्र्यांपर्यंत पोहोचवणार. आमदार महेश बालदी यांनी ज्या ज्या समस्या सांगितल्या आहेत, त्या सर्व समस्या सोडवण्याची जबाबदारी आमची आहे, अशी ग्वाही मंत्री शेलार यांनी दिली. **(पान २ वर..)**

# महाराष्ट्रातील पूरग्रस्तांसाठी केंद्राकडून १,५६६.४० कोटी रुपये मदत मंजूर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी २०२५-२६ या वर्षासाठी कर्नाटक आणि महाराष्ट्र राज्य सरकारांना एसडीआरएफच्या केंद्रीय हिश्श्याचा ब म्हणून १, ९५०.८० कोटी रुपये आगाऊ देण्यास मान्यता दिली आहे. या वर्षी नैऋत्य मान्सूनमध्ये अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या लोकांना तत्काळ मदत करण्यासाठी या राज्यांना मदत करण्यासाठी १,९ ५०.८० कोटी रुपयांच्या एकूण रकमेपैकी ३८४.४० कोटी रुपये कर्नाटकसाठी आणि १,५६६.४० कोटी रुपये महाराष्ट्रासाठी मंजूर करण्यात आले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या मार्गदर्शनाखाली, केंद्र सरकार पूर, भूस्खलन आणि ढगफुटीमुळे बाधित झालेल्या राज्यांना सर्वतोपरी मदत करण्यास पूर्णपणे वचनबद्ध आहे.

या वर्षी, केंद्राने SDRF अंतर्गत २७ राज्यांना १३,६०३.२० कोटी रुपये आणि NDRF अंतर्गत १५ राज्यांना २,१८९.२८ कोटी रुपये आधीच जारी केले आहेत. याव्यतिरिक्त, राज्य आपत्ती निवारण निधी (SDMF) मधून २१ राज्यांना ४,५७१.३० कोटी रुपये आणि राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी (NDMF) मधून ०९ राज्यांना ३७२.०९ कोटी रुपये जारी केले आहेत.

केंद्र सरकारने पूर, भूस्खलन, ढगफुटी यासारख्या घटनांमध्ये बाधित झालेल्या सर्व राज्यांना आवश्यक असलेले मदत सहाय्य पुरवले आहे.



### राज्य सरकारकडूनही निधी

महाराष्ट्र सरकारनेही राज्यासाठी मदत जाहीर केली आहे. यामध्ये कोकणातील एक लाख ५ हजार २३९ हजार शेतकऱ्यांच्या २९ हजार २३३.१६ हेक्टर बाधित क्षेत्रातील २८ कोटी १० लाख ६३ हजार निधी देण्यात आला असून यात रायगड जिल्ह्यातील १८ हजार ५७८ शेतकऱ्यांच्या पाच हजार ८२९. ४६ हेक्टर क्षेत्रासाठी पाच कोटी नऊ लाख नऊ हजार रुपये मदत करण्यात येणार आहे.




**नवीन पनवेल : राजे शिवराय प्रतिष्ठानच्या वतीने सेक्टर ५ ए येथील पोलीस मैदानावर दुर्ग दर्शन सोहळा आयोजित केला असून जलदुर्ग खांदेरीची भव्य प्रतिकृती साकारण्यात आली आहे. या सोहळ्याचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांचे स्वागत प्रतिष्ठानचे प्रमुख संजय पाटील व सहकाऱ्यांनी केले. या वेळी भाजप महिला मोर्चा नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष राजेश्री वावेकर, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, किशोर चौतमोल आदी उपस्थित होते. दरम्यान, प्रतिष्ठानचे हे १५वे वर्ष असून २९ ऑक्टोबरपर्यंत दुर्गप्रतिकृती पाहण्यासाठी खुली आहे.**

## शनिवार वाड्यावर नमाज पठण

**पुणे :** शनिवार वाड्यात नमाज पठण झाल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यापासून पुणे शहरात राजकीय आणि सामाजिक वर्तुळात खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे हिंदुत्ववादी संघटना, पतित पावन संघटना आणि भाजपचे नेते आक्रमक झाले आहेत.

शनिवार वाड्याच्या परिसरात आंदोलन करण्यात आले. परिसरात गोमूत्र शिंपडून 'शुद्धीकरण' करत 'शिववंदना' करण्यात आली.




# लोकनेते रामशेठ ठाकूर यांची रांगोळी ठरली प्रदर्शनाचे आकर्षण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

व्ही.के सेव्हन्टी फाय (७५) सामाजिक मंडळ आणि रंगदीप क्रिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने खास दिवाळीनिमित्त पनवेल येथील सीकेपी हॉल मध्ये भव्य रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते या भव्य दिव्य दिमाखदार प्रदर्शनाचे उद्घाटन शनिवारी करण्यात आले. या उद्घाटन समारंभासाठी सीकेपी हॉलचे कार्यकारी सदस्य राजू गुप्ते, यांच्यासह व्ही. के सेव्हन्टी फाय (७५) सामाजिक मंडळाचे सर्व सदस्य, रंगदीप क्रिएशनचे सर्व कलाकार सदस्य आणि इतर नागरिक याप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख उद्घाटक म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर यांना निमंत्रित करण्यामागे एक खास प्रयोजन होते. व्ही. के सेव्हन्टी फाय (७५) सामाजिक मंडळाचे सदस्य हे सालच्या वी चे विठोबा खंडाप्पा हायस्कूलचे विद्यार्थी आहेत आणि त्यावेळी रामशेठ ठाकूर त्यांना शिक्षक म्हणून लाभले होते. या सर्व विद्यार्थ्यांनी २५ वर्षांनी म्हणजेच २६ जानेवारी २००० रोजी एकत्र येऊन हे मंडळ स्थापन केले. आज २०२५ मध्ये मंडळाच्या स्थापनेला २५ वर्षे पूर्ण होत आहेत, तसेच सदस्यांच्या एसएससीला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. याशिवाय, १९७५ साली शिक्षक म्हणून लाभलेल्या लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे हे अमृत महोत्सवी वर्ष आहे. हा त्रिवेणी संगम साधून मंडळाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांना या रांगोळी प्रदर्शनाच्या निमित्ताने प्रमुख उद्घाटक म्हणून बोलावून त्यांचा अमृत महोत्सवी सत्कार करण्याचे ठरविले आणि तो उत्साहात पार पाडला.

रंगदीप क्रिएशनमधील सर्व नवोदित कलाकारांना प्रोत्साहन मिळावे, त्यांच्या पुढील उत्तम वाटचालीस मदत व्हावी या दृष्टिकोनातून व्ही.के सेव्हन्टी फाय (७५) सामाजिक मंडळाने हा उपक्रम हाती घेतला आहे. रांगोळी प्रदर्शनाचे विषेश आकर्षण छत्रपती शिवाजी महाराज, लोकनेते रामशेठ ठाकूर, दशावतार, वासुदेव बळवंत फडके, रतन टाटा, देव आनंद व अन्य रांगोळ्या आहेत.

हे रांगोळी प्रदर्शन १८ ते २६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुले ठेवण्यात आलेले आहे. कलाप्रेमी नागरिक आणि रसिकांनी या प्रदर्शनाचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन व्ही.के सेव्हन्टी फाय ७५) सामाजिक मंडळ आणि रंगदीप क्रिएशन यांनी केले आहे. **(पान २ वर..)**



# वंचित व्यक्तीला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनाचे प्रयत्न –मुख्यमंत्री

**नागपूर : प्रतिनिधी**

सामाजिक न्यायाच्या दृष्टीने एक व्यापक विचार आम्ही बाळगला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून शेवटच्या घटकातील माणसाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी जी दूरदृष्टी बाळगली ती प्रत्यक्षात आम्ही समाजातील विविध घटकांना प्रत्ययास देत आहोत. त्यांना अभिप्रेत असलेल्या सामाजिक विकासासाठी आम्ही कटिबद्ध असून सामाजिक न्याय विभागाचा हा विविध योजनांतर्गत लाभार्थ्यांना थेट लाभ पोहचविण्याचा उपक्रम याचेच द्योतक असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

दिवंगत ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक न्याय विभागाच्या समारंभात ते बोलत होते. प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेंतर्गत जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा यादृष्टीने ई–रिक्षा व इतर वैयक्तिक लाभ योजना वाटप समारंभास महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, गृहनिर्माण तथा इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, वित्त राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, सर्वश्री आमदार कृपाल तुमाने, परिणय फुके, डॉ. आशिष देशमुख, मोहन मते, चरणसिंग ठाकुर, संजय मेश्राम, राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर, सामाजिक न्याय व



विशेष सहाय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, मनपा आयुक्त अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, सामाजिक न्याय विभागाच्या सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

वंचित घटकांना स्वंयरोजगाराची साधने मिळण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून शासन प्रयत्नरत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आपण महिलांनाही मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नांची शर्त केली आहे. राज्यात आपण २५ लाख दीदींना लखपती केले आहे. आजच्या घडीला राज्यात सुमारे ५० लाख दीदी आता लखपती दीदी झाल्या आहेत. लवकरच १ कोटी दीदींना लखपती करण्याचा संकल्प आपण पूर्ण करू असा, विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

जिल्ह्यातील मांग–गारुडी व इतर वंचित घटकातील व्यक्तींना विकासाच्या प्रवाहात घेण्यासाठी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रत्येक वाडी वस्तीवर जाऊन शासनाचे विशेष कॅम्प लावले. यातून या समाजाला त्यांच्या हक्काचे ओळखपत्र मिळाले. यामुळे रमाई आवास सारख्या योजना प्रभावीपणे त्यांच्यापर्यंत पाहचविणे आता सहज शक्य झाल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगून पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कार्याचा गौरव केला.

आदिवासी व्यक्तीला ऊर्जा दाता करण्याची नाविन्यपूर्ण योजना राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल यांनी मांडली. यानुसार नाविन्यपूर्ण योजनेतून प्रत्येक आदिवासी घरावर सौरऊर्जा देण्याचे नियोजन झाले. या योजनेतील उपयोगीता लक्षात घेवून लवकरच अनुसूचित जाती व इतर मागासवर्ग घटकातील उपेक्षित लोकांनाही या योजनेचा लाभ पोहचू असे, सुतोवाच त्यांनी केले.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते कर्जतमध्ये दुकानाचे उद्घाटन



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत बाजारपेठेमध्ये माजी उपगराध्यक्ष अशोक ओसवाल यांनी अष्टविनायक गोल्ड या दुकानाचे नूतनिकरण करून 'पी डी गोल्ड' हे सोन्याचे दुकान सुरु केले आहे. या दुकानाचे उदघाट्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

या वेळी भाजपा जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ओबोसी जिल्हाध्यक्ष राजेश भगत, सरचिटणीस दीपक बेहेरे, शहर सचिव अतुल बडगुजर, नितीन कांदळगावकर, माजी नगरसेविक भालचंद्र जोशी, स्वामीनी मांजरे, हिम्मतमल ओसवाल, दिनेश जैन, ओटरमल ओसवाल, रोहित ओसवाल, दिनेश सोलंकी आदी उपस्थित होते.

# 'एक तास वाचनाचा' उपक्रमाद्वारे वाचन प्रेरणा दिन साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

पुस्तके वाचल्याने आपले शब्दभांडार वाढते, कोणत्याही विषयावर ऐनवेळी बोलता येऊ शकते तसेच व्यक्तिमत्वाचा विकास होतो, त्यामुळे वेळ काढून दिवसभरात पुस्तकातील काही पाने तरी वाचावीत असे सांगत अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी कार्यालयीन कामकाजासाठी केल्या जाणा–या वाचनाच्या पलीकडे जाऊन अवांतर वाचनामुळे होणारे अनेक फायदे सांगितले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी. जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीदिनी साजरा करण्यात येणा–या 'वाचन प्रेरणा दिना' निमित्त महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'एक तास वाचनाचा' हा अभिनव उपक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी पुस्तके वाचनाचे महत्व अधोरेखीत करीत आपल्या आवडत्या पुस्तकांविषयी तसेच पुस्तक वाचनामुळे विविध प्रसंगी झालेला लाभ याबाबत उपस्थितांशी संवाद साधला.

आपल्या शासकीय कारकिर्दीत वेगवेगळ्या शहरांमध्ये कार्यालयीन कामकाजात आलेले विविधांगी अनुभव कथन करीत अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी माजी उपमुख्यमंत्री स्व.आर आर पाटील यांच्याकडून 'काय वाचावे ?' याविषयी मिळालेल्या मार्गदर्शनाचा विशेष उल्लेख केला. त्यांच्याच सल्ल्यामुळे स्व.यशवंतराव चव्हाण यांची सर्व पुस्तके मनापासून वाचल्याचे सांगत 'यशवंतराव चव्हाण – विधीमंडळातील निवडक भाषणे' या पुस्तकाचा जीवनात विविध प्रसंगी झालेला उपयोग त्यांनी सांगितला.

दररोज सोशल मिडीयावर दिल्या जाणा–या वेळेतील काही वेळ आवर्जून काढून तो वाचनासाठी देणे आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी हितावह असेल असे सांगतांना दररोज झोपतांना किमान दोन पाने वाचा, लक्षात ठेवा, त्यासाठी पुस्तक वाचल्यानंतर सारांक्ष लेखनाची सवय लावून घ्या असाही सल्ला त्यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचारी व नागरिकांना दिला.

याप्रसंगी उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड यांनी पुस्तके ही सर्वोत्तम मित्र असल्याचे सांगत वाचनामुळे आपण समृध्द होतो व त्याचा चांगला परिणाम आपल्या वागण्या – बोलण्यातही दिसून येतो असे सांगितले. सुप्रसिध्द साहित्यिक पु.ल.देशपांडे यांच्या लोकप्रिय 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकाचे वेगळेपण अधोरेखीत करीत त्यामधील 'नारायण' या पात्रावरील प्रकरणातील काही भाग त्यांनी नाट्यमय शैलीत वाचून दाखवला.

नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयाप्रमाणेच महानगरपालिकेची ३१ ग्रंथालये तसेच शहरातील महानगरपालिकेसह खाजगी शाळा व महाविद्यालयांमध्येही वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे उत्साहाने आयोजन करण्यात आले होते.त्याचप्रमाणे वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून नागरिकांनी आपल्याकडील जुनी वाचनीय पुस्तके अनेकांना वाचनासाठी उपलब्ध होण्यासाठी ग्रंथालयांना भेट द्यावीत असे महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केलेल्या आवाहनासही चांगला प्रतिसाद मिळत आहे.



## घरात घुसून सहा जणांना मारहाण

**नवी मुंबई : बातमीदार**

किरकोळ कारणावरून तिघांनी घरात घुसून मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तुर्भे पोलिस ठाण्यात तिघांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.


तक्रारदार ब्रिजेश सिंग (वय ३८) मजुरीचे काम करीत असून, तुर्भे नाका येथील हनुमान नगरमध्ये इतर पाच व्यक्तींबरोबर दहा वर्षांपासून राहतो. ब्रिजेश रोजंदारीवर काम करतो. त्याच्यासोबत काम करणारे घणसोली येथील रहिवासी असलेले कैलास डोळे, आकाश डोळे आणि परेश मोहिते यांनी कामावरील सहकाऱ्याशी किरकोळ कारणाने वाद घालत त्याला व अन्य पाच जणांना जबर मारहाण करण्यात आली.

गुरुवारी ब्रिजेश याच्या घरी येऊन शिवीगाळ करायला सुरुवात केली. उलट बोलल्याबाबत विचारणा करीत त्यांनी तक्रारदार ब्रिजेश याच्यासह घरातील उमेश पासवान, गिरीश यादव, लल्लू सिंग, रमेश पासवान आणि बहादूर सिंग यांना पट्ट्याने जबर मारहाण केली. यात ब्रिजेश आणि उमेश पासवान गंभीर जखमी झाले आहेत. ब्रिजेशच्या तक्रारीवरून तिघांविरोधात गुन्हा दाखल केला.

## धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी नवी मुंबईत सर्वत्र व्यापक स्वच्छता

**नवी मुंबई : बातमीदार**

सध्या पाऊस ओसरत असताना वातावरणातील उष्णता कमालीची वाढली असून पावसाळी कालावधीतील रस्त्यांकडेचा चिखल वाळल्याने धुळीच्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. या गोष्टाकडे गांभीर्याने लक्ष देत नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी प्राधान्याने शहरातील मुख्य रस्त्यांवर व्यापक स्वच्छता मोहीम हाती घेण्याचे निर्देश दिले होते.



त्यास अनुसरून घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत वाहनांची मोठ्या प्रमाणावर रहदारी असते व नागरिकांची वर्दळ असते असे शहरातील ठाणे बेलापूर मार्ग, आम्र मार्ग, पामबीच मार्ग तसेच अंतर्गत मुख्य रस्ते या रस्त्यांवरील तसेच रस्त्यांच्या कडेला साचलेली माती साफ करून उचलून घेण्याची सखोल स्वच्छता मोहीम हाती घेतलेली आहे. या साफसफाईत ब्रशने रस्त्याचा पृष्ठभाग साफ केला जात आहे तसेच फ्लिपर मशीनचाही वापर केला जात आहे. यासोबतच यांत्रिकी मशीनचाही उपयोग रस्ते सफाईसाठी प्रभावीपणे केला जात आहे.

घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत नियमित केली जाणारी साफसफाई दिवसातून दोन वेळा दोन सत्रात अधिक काळजीपूर्वक केली जात असून त्यामध्ये रस्त्यांवरील मातीही साफ करण्याकडे प्रामुख्याने लक्ष दिले जात आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांच्यासह त्यांचा स्वच्छता अधिकारी व स्वच्छता निरीक्षकांचा समुह या कामाकडे प्रत्यक्ष पाहणी करून बारकाईने लक्ष देत असून अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्यामार्फतही या सखोल स्वच्छता कामाकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

नवी मुंबई शहराची नियमित स्वच्छता करताना धुळीमुळे होणारे वायू प्रदूषण कमी व्हावे या भूमिकेतून दिघ्यापासून बेलापूरपर्यंत आठही विभाग कार्यालय क्षेत्रात अगदी दिवाळीच्या सणातही सुरू असलेल्या या सखोल स्वच्छता मोहीमेबद्दल नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## पान १ वरुन

### सर्वसामान्यांच्या समस्या सोडविण्यासाठी भाजप कटिबद्ध –मंत्री आशिष शेलार

**पक्षप्रवेश कर्त्यांची नावे**

उरण तालुक्यातील केगाव परिसरातील काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत नेते राजेंद्र ठाकूर (नाना) यांच्या सह ११८ कार्यकर्त्यांनी भाजप मध्ये जाहीरप्रवेश केला. देवराम ठाकूर, संजय म्हात्रे, संजना म्हात्रे, निहाल म्हात्रे, नंदकुमार म्हात्रे, मीना म्हात्रे, सुधाकर पाटील, मेघना पाटील, मालती बेतकर, मनोज ठाकूर, गजानन ठाकूर, विलास ठाकूर, अलंकार ठाकूर, हीना पाठारे, संदीप पाठारे, हेमांगी ठाकूर, अनिकेत ठाकूर, प्रतीक्षा ठाकूर, दिनेश ठाकूर, मनोज पाटील, जागृती पाटील, प्रथमेश ठाकूर, धनश्री ठाकूर, हरिचंद्र पाटील, नंदकुमार पाटील, रेखा पाटील, निशा ठाकूर, विलास पाटील, मंदा पाटील, सचिन पाटील, सुगंधा ठाकूर, दिलीप पाटील, मच्छिंद्र ठाकूर, रश्मी ठाकूर, जनार्दन ठाकूर, दिगंबर ठाकूर, दिपाली ठाकूर, मोहित ठाकूर, कमलाकर पाटील, प्रीती ठाकूर, विपुल पाटील, सिद्धार्थ पाटील, कृपाली पाटील, अरनाथ पाटील, निनाथ पाटील, स्नेहल पाटील, महादेव ठाकूर, मोहन पाटील, विजय पाटील, मीना पाटील, आकाश ठाकूर, विठ्ठल ठाकूर, सीमा पाटील, भक्ती पाटील, जयश्री पाटील, सुरज पाटील, सयुकता पाटील, मनीषा पाटील, मीनाक्षी पाटील, धर्मेंद्र ठाकूर, जितेंद्र पाटील, चंद्रकांत पाटील, दीपक ठाकूर, मेघा ठाकूर, महेश ठाकूर, अर्चना ठाकूर, चंद्रकांत कांबळे, नीलम पाटील, विश्वनाथ पाटील, जिजाबाई पाटील, अनंत म्हात्रे, अनिता म्हात्रे, समीर पवार, गीता पवार, प्राची म्हात्रे, रुपेश म्हात्रे, रितू म्हात्रे, निखील म्हात्रे, हेमंत पाटील, भावना पाटील, गणेश पाटील, विशाल, विनोद पाटील, सरिता पाटील, संध्या पाटील, किशोर पाटील, हर्शल, नरेंद्र ठाकूर, ललिता ठाकूर, ऋषिकेश ठाकूर, शोभा ठाकूर, महेश पाटील, रोशनी पाटील, भारती पाटील, निलेश घरत, संजू चव्हाण, शैलेश पुरव, विद्या ठाकूर, बाळकृष्ण ठाकूर, सीमा ठाकूर, प्रभाकर ठाकूर, प्रवीण पाटील, असलेश पाटील, राजेंद्र पाटील, कुंदन पाटील, भालचंद्र पाटील, गणेश पाटील, रजनी पाटील, मंगेश ठाकूर, प्रतीक्षा ठाकूर, श्रीमती हिराबाई ठाकूर, माजी सरपंच केगाव (उबाठा) दिपेश कोळी, करण पाटील, साहिल पठाण आदी केगाव ग्रामस्थांनी भाजप मध्ये जाहीर प्रवेश केला.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांची रांगोळी ठरली प्रदर्शनाचे आकर्षण

या रांगोळी प्रदर्शनात गणपती – दिशा पाटील, व्हि.के.७५ सिम्बॉल– शरयु घरत, लोकनेते रामशेठ ठाकूर – मनोज भोपी, कलावंती – योगेश्री ढमाले, कानिफनाथ महाराज – नेहा धामणकर, वात्सल्य – नेहा घरत, वैजयंती माला – प्रकाश नवाळे, दशावतार – योगेश्री ढमाले, वासुदेव बळवंत फडके – दिलीप शिगवण, हनुमान चालीसा – किर्ती, योगेश्री, साईबाबा – डॉ. अमोल सलाग्रे, देवानंद – ज्ञानेश्वर कारेकर, रतन टाटा – डॉ. दिलीप शिगवण, शिवाजी महाराज – किर्ती घरत, कामधेनु – तन्वी भोपी, हनुमान – हिमांशु भोपी, राधा कृष्ण – रत्नेश घरत, कांतारा – कशिश तिखे, संस्कार भारती – शरयु घरत यांनी अशा रांगोळ्या काढल्या आहेत.

## विद्यार्थ्यांनी सोशल मीडियावर वेळ वाया घालवू नये –अवधूत साठे

**कर्जत : प्रतिनिधी**

'फक्त पैशाचा विचार करू नका, स्वत:च्या प्रगतीवर आणि कौशल्य वृद्धीवर लक्ष केंद्रित करा. आणि सातत्यपूर्ण सरावाद्वारे उत्कृष्टता साधा. विद्यार्थ्यांनी बाजारातील अफवा किंवा टिप्सवर विश्वास ठेवू नका. निरीक्षण आणि विश्लेषण या गुणांचा शेअर बाजारात तितकाच महत्त्वाचा उपयोग होतो जितका तो औषधनिर्माण क्षेत्रात आहे. ज्ञानाधारित गुंतवणुकीद्वारे आर्थिक स्वातंत्र्य साध्य करण्यासाठी प्रयत्नशील राहावे.' असा मौलिक सल्ला अवधूत साठे ट्रेडिंग अकॅडमीचे संस्थापक अवधूत साठे यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यायात अंतर्गत गुणवत्ता हमी प्रकोष्ठच्या वतीने एक ज्ञानवर्धक परिसंवादाचे आयोजन सेमिनार हॉल मध्ये करण्यात आले होते. याप्रसंगी माजी नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, प्राचार्य डॉ. मोहन काळे, उपप्राचार्य डॉ. अमोल चांदेकर आदी उपस्थित होते.

साठे यांनी त्यांच्या 'अंकुरण प्रकल्प' या संकल्पने विषयीही सांगितले आणि विद्यार्थ्यांना जिज्ञासा, शिस्त आणि सातत्यपूर्ण शिक्षण यांचा अवलंब करण्यास प्रेरित केले. सेमिनारनंतर वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला, ज्याद्वारे विकास, शाश्वतता आणि ज्ञान व निसर्ग संवर्धनाचा संदेश देण्यात आला. परिसंवादाचा समारोप प्रश्नोत्तर सत्राने झाला.



## खासदार छत्रपती शाहू महाराजांची ऐतिहासिक जंजिरा किल्ल्याला भेट




**मुरुड : प्रतिनिधी**

दिवाळीचे औचित्य साधून मुरुड राजपुरी येथील अरबी समुद्रात असणारा ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी आज कोल्हापूर येथील छत्रपती शाहू विद्यालयातील १५ तारा कमांडो फोर्ससह खासदार छत्रपती शाहू महाराजांनी ऐतिहासिक जंजिरा किल्लाला भेट दिली.यावेळी मुरूड अलिबाग पुरातत्व विभागाचे सहाय्यक संवर्धक अधिकारी बजरंग येलीकर यांनी त्यांचे स्वागत केले.व छत्रपती शाहू विद्यालयातील तारा कमांडो फोर्स यांना ऐतिहासिक जंजिरा किल्ला संदर्भातील माहिती सांगितली.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचे बारावे वंशज खासदार शाहू छत्रपती,मुरूड अलिबाग पुरातत्व विभागाचे सहाय्यक संवर्धक अधिकारी बजरंग येलीकर,खोरा बंदर निरीक्षक– प्रमोद राऊळ, राजपुरी बंदर निरीक्षक प्रभाकर पवार, बहुउद्देशीय कर्मचारी प्रकाश घुगरे , कर्नल अलेक्स, कर्नल आशिष सुतार, माणिक मंडलिक, राजश्री पाटील, जयंती इंदुलकर आणि छत्रपती शाहू विद्यालयातील तारा कमांडो फ़ोर्स व शिक्षिका तसेच अन्य स्टाफ उपस्थित होते.यावेळी छत्रपती शाहू महाराजांनी पुरातत्व विभागाला किल्ला भोवती स्वच्छ ठेवा व वेळीच संवर्धन करा. असा मोलाचा सल्ला यावेळी छत्रपती शाहू महाराजांनी दिला. जंजिरा किल्ल्यास ऐतिहासिक महत्व आहे.त्यामुळे या किल्ल्याचे संवर्धन होणे काळाची गरज असल्याचे सांगितले

**दुखवटा**

### गजानन चौलकर



**अलिबाग:** पशूचिकित्सक व्यवसायी संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष डॉ. कैलास चौलकर यांचे वडील गजानन धर्मा चौलकर यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी (दि. १७) निधन झाले. ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, जावई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.२८ ऑक्टोबर रोजी गजानन चौलकर यांचे उत्तरकार्य साखर, आक्षी येथील त्यांच्या निवासस्थानी करण्यात येणार आहे.

### राजेंद्र साठे



**पाली:** समाजसेवक व सुप्रसिद्ध इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर राजेंद्र सदाशिव साठे (वय ५३) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. राजेंद्र साठे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, आई, एक भाऊ व तीन बहिणी असा आप्तपरिवार आहे. राजेंद्र साठे यांचा दशक्रिया विधी गुरुवारी (ता. २३) उद्धर रामेश्वर येथे होणार आहे. तसेच उत्तरकार्य शुक्रवारी (ता. २४) ताडगाव येथे आहे.

# मिडलक्लास सोसायटी विविध उपक्रमांचे केंद्र बनतेय -आमदार प्रशांत ठाकूर




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मिडलक्लास हौसिंग सोसायटी ही विविध उपक्रमांचे केंद्र बनत आहेत, असे गौरवोद्गार आमदार प्रशांत ठाकूर दीपोत्सवाच्या उदघाटनावेळी काढले. दिवाळीच्या मंगलमय स्वागतासाठी पनवेलमधील सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने दीपोत्सव २०२५ या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी केले होते. पनवेलकरांसाठी हा सोहळा मनोरंजन, इतिहास आणि समाज एकात्मतेचा सुंदर संगम ठरला.

या दिमाखदार कार्यक्रमाचा शुभारंभ डॉक्टर सुहास हळदीपूरकर यांच्या हस्ते आणि पनवेल मतदार संघाचे कार्यक्षम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थिती झाला. या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ही भेट देऊन आयोजकांना व उपस्थितांना शुभेच्छा देऊन प्रसिद्ध वक्ते सुदर्शन शिंदे यांच्या व्यख्यानाचे कौतुक केले तसेच त्यांना पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. दीपोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरले ते, नेत्रदीपक आकर्षक फायरवर्क्स आणि लाईट शो. या रोषणाईने संपूर्ण परिसर उजळून निघाला आणि दिवाळीच्या उत्साहाला एक खास रंगत आली. विविध रंगांच्या आणि आकारांच्या दिव्यांची सजावट करण्यात आली होती, ज्यामुळे एक मनमोहक आणि उत्साहवर्धक वातावरण निर्माण झाले होते.

सांस्कृतिक मनोरंजनासोबतच वैचारिक मेजवानी देण्यासाठी कार्यक्रमात शिवव्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रसिद्ध वक्ते सुदर्शन शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि गडकोट या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. छत्रपती शिवरायांचे पराक्रम, त्यांचे गडकोट व्यवस्थापन आणि त्यातून मिळणारी प्रेरणा यावर त्यांनी विचार मांडले. या व्याख्यानाने उपस्थितांना गौरवशाली स्मृतींचा अनुभव मिळाला. या यशस्वी आयोजनामागे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, एम.सी.सी.एच. सोसायटीचे अध्यक्ष आणि उद्योजक राजु गुप्ते, सोसायटी मित्र मंडळाचे अध्यक्ष तथा भाजपचे पनवेल शहरध्यक्ष सुमित झुंजारराव यांची अथक मेहनत होती. दीपोत्सवाच्या निमित्ताने पनवेलकरांना दिवाळीच्या आनंदासोबतच इतिहास आणि समाज एकात्मतेची भावना अनुभवण्याची अनोखी संधी मिळाली.

या कार्यक्रमाला भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, भाजपनेते जयंत पगडे, माजी नगरसेवक अनिल भगत, गणेश कडू, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, डॉ. सुरेखा मोहोकर, अनुराधा ठोकळ, रुचिता लोंढे, सारिका भगत, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंजारराव उद्योगपती राजू गुप्ते, विलास कोठारी, मंगेश परुळेकर, मिलिंद पोटे, डॉक्टर सुहास हळदीपूरकर, शहर उपाध्यक्ष केदार भगत, सरचिटणीस अमित ओझे, रुपेश नागवेकर, प्रभाग क्रमांक १९ अध्यक्ष पवन सोनी, संजय जैन, प्रशांत शेटे, प्रवीण मोरबाळे, यांच्यासह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेलमध्ये भाजयुमोतर्फे किल्ला बांधणी स्पर्धा

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राची शौर्य परंपरा आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा गड-किल्ल्यांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहचवण्यासाठी पनवेल शहर भाजप युवा मोर्चाच्या वतीने दिवाळीच्या निमित्ताने किल्ला बांधणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेंतर्गत विविध ठिकाणी बांधण्यात आलेल्या किल्ल्यांची पाहणी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केली.

या वेळी त्यांनी कट्टा परिवार, यशोपुरम वसंत सोसायटी आणि बल्लाळेश्वर मंदिर परिसरात स्पर्धकांनी उभारलेल्या किल्लूयांची विशेष पाहणी करून त्यांच्या कलाकृतीचे कौतुक केले. या किल्लूयांच्या बांधणीतून स्पर्धकांनी दाखवलेल्या कल्पकतेला आणि इतिहासाच्या अभ्यासाला त्यांनी दाद दिली.

या स्पर्धेतील विजेत्यांना एकूण ५० हजार रुपयांपर्यंतची रोख पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. यात प्रथम क्रमांकास १० हजार, द्वितीय क्रमांकास ७ हजार, तृतीय क्रमांकास ५ हजार तसेच उत्तेजनार्थ बक्षिसे मधून प्रत्येकी हजार तर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व स्पर्धकांना भाजयुमोतर्फे सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

या पाहणी दौऱ्यावेळी भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंजारराव, युवा मोर्चा शहर अध्यक्ष हिमेश बहिरा, तसेच युवा मोर्चाचे पदाधिकारी देवांशु प्रभाळे, अनिमेश ओझे, अभिषेक पटवर्धन, हर्षल भास्कर, कोमल कोळी, शुभम कांबळे आदी उपस्थित होते.




# उटणे वाटप उपक्रमाच्या शुभारंभासह लोकनेते रामशेठ ठाकूर यांना दिवाळीच्या शुभेच्छा










**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे ओबीसी मोर्चा सेलचे जिल्हा अध्यक्ष एकनाथ देशेकर, भटके विमुक्त आघाडीचे जिल्हा अध्यक्ष बबन बारगाजे आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अशोक हसुराम साळुंखे यांच्या संयुक्त विद्यमाने सुगंधी उटणे वाटप उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

या स्तुत्य उपक्रमाचा शुभारंभ आणि सुगंधी उटण्यांच्या वाटपाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह आमदार प्रशांत ठाकूर यांनी या उपक्रमाचे कौतुक करून सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमावेळी कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, माजी नगरसेवक निलेश बावीस्कर आणि विजय चिपळेकर, माजी सरपंच कमला देशेकर, समीना साठी, प्रतिभा भोईर, कळंबोली शहर चिटणीस बायजाबाई बारगजे, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, प्रभाग आठचे अध्यक्ष प्रकाश शेलार, आध्यात्मिक आघाडीचे मंडळ अध्यक्ष लक्ष्मण जायभाय, युवा कार्यकर्ते महेश बारगजे, विजय जायभाय, शुभम गवस, हर्षवर्धन पाटील, दामोदर चव्हाण, रोहीत आठवणे आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# भाजप खारघरतर्फे दिवाळी संध्या उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळीनिमित्त खारघरमधील नागरिकांसाठी भाजप खारघरच्या वतीने यंदाही सुश्राव्य गाण्यांची दिवाळी संध्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली खारघरमधील गावदेवी मैदानावर शनिवारी (दि.१८) हा भव्य संगीतमय कार्यक्रम उत्साहात झाला.




संगीत, संस्कृती आणि कलेचा संगम साधणाऱ्या या कार्यक्रमात रसिकांनी प्रचंड गर्दी केली होती. या दिवाळी संध्या कार्यक्रमात संगीत क्षेत्रातील सुप्रसिद्ध कलाकारांनी आपल्या बहारदार गाण्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. विशेषतः राधा ही बावरी फेम लोकप्रिय गायक स्वप्नील बांदोडकर, तसेच गायक के. शिरीष, गायिका गुल सक्सेना आणि सपना हेमन यांनी विविध प्रकारच्या गीतांचे दमदार सादरीकरण केले. त्यांच्या सुरेल मैफिलीने दिवाळीच्या वातावरणात अधिकच रंग भरले. मराठी चित्रपटगीते आणि हिंदी गाण्यांच्या संगमामुळे हा कार्यक्रम खारघरकरांसाठी अविस्मरणीय ठरला. खारघर आणि परिसरातील नागरिकांना दिवाळीच्या काळात एक उत्कृष्ट सांस्कृतिक मेजवानी मिळावी, या उद्देशाने भाजपने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थितांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, किरण पाटील, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, ॲडव्होकेट नरेश ठाकूर, गुरुनाथ गायकर, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, हर्षदा उपाध्याय, विजय पाटील, संजय घरत, समीर कदम, वासुदेव पाटील, रामचंद्र पाटील, खारघर शहर महिला मोर्च्याच्या अध्यक्षा साधना पवार, सीमा खेडकर, अमर उपाध्याय, सांस्कृतिक सेलचे अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, अक्षय लोखंडे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, उपस्थित होते.

या आयोजनाबद्दल खारघरमधील नागरिकांनी आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजप पदाधिकाऱ्यांचे विशेष आभार मानले.



**पनवेल : गव्हाण ग्रामविकास समितीच्या शिष्टमंडळाने माजी खासदार तथा लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली आणि त्यांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. या वेळी ग्रामविकास समितीचे अध्यक्ष हेमंत ठाकूर, पंचायत समितीचे माजी सदस्य भाऊशेठ पाटील, सल्लागार जयवंत देशमुख, अशोक कडू, कैलास कोळी उपाध्यक्ष किरण देशमुख, सुनील कोळी, सचिव मनोज कोळी, सदस्य काशिनाथ कोळी, महेंद्र देशमुख, विनायक कोळी, अभिजित कोळी, सुयोग कोळी, कमळाकर कोळी, अविनाश कोळी, स्नेहलता ठाकूर, उषा देशमुख, पूर्वा वास्कर, निशा कोळी, प्रमिला देशमुख आदी उपस्थित होते.**

# दिवाळीत कलाविष्काराची जपणूक

- आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन
- खारघर येथे दिवाळी पहाट उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळी सण म्हणजे आनंद, उत्साह, प्रकाश आणि संस्कृतीचा मिलाफ. या पार्श्वभूमीवर स्पंदन एंटरटेनमेंट तर्फे रविवारी सेक्टर २१, सिडको गार्डन, खारघर येथे दिवाळी पहाट या सुरेल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते. या वेळी त्यांनी दिवाळीत समाजात आनंद, एकोपा आणि कलाविष्काराची जपणूक होत असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे आयोजन शाश्वत फाउंडेशनच्या सहकार्याने करण्यात आले होते. संस्थेच्या अध्यक्षा बीना गोगरी यांनी या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. मराठी सुगम संगीताच्या गोड सुरांनी सजलेल्या या दिवाळी पहाट कार्यक्रमाने उपस्थित नागरिकांना सकाळच्या वेळेस नव्या उर्जेचा आणि आनंदाचा अनुभव दिला.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले, दिवाळी म्हणजे आपल्या संस्कृतीचा उत्सव. अशा सांस्कृतिक उपक्रमांमुळे समाजात आनंद, एकोपा आणि कलाविष्काराची जपणूक होते. स्पंदन एंटरटेनमेंटसारख्या संस्था वर्षभर समाजहिताचे कार्यक्रम राबवत असतात, याचे कौतुक करावे तितके थोडेच आहे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात स्पंदन म्युझिक एकेडमी चे संस्थापक गफार शेख, सौरभ पान्डे, चारू तबडके, प्रफुल्ल माणगांवकर, रविंद्र अहिरे, रवी वेंगुर्लेकर, समता मोदी, सारंग मोदी आदि गायकांनी आपल्या सुरेल गाण्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमाला भाजपचे नेते आणि खारघर शहराचे माजी अध्यक्ष ब्रिजेश पटेल, पनवेल तालुका चिटणीस सचीन वासकर, भाजपा खारघर मंडल सरचिटणीस दिपक शिंदे, भाजपा खारघर मंडल उपाध्यक्ष अमर उपाध्याय, जागृत फाऊंडेशन चे अध्यक्ष ज्ञानेश्वर खरपुरिया व उपाध्यक्ष शिवम सिंग, रोटरी क्लब मिडटाऊन खारघरचे अध्यक्ष शैलेश पटेल,अन्जु पटेल, स्मिता आचार्य, नीता गोगरी यांच्यासह शेकडो श्रोत्यांनी या मैफिलीचा आनंद घेतला.

दिवाळीच्या या शुभप्रसंगी स्पंदन एंटरटेनमेंट आणि शाश्वत फाउंडेशन तर्फे समाजात सांस्कृतिक आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देण्याचा प्रयत्न यशस्वी ठरला.



## संपादकीय

# ट्रम्प यांच्या विरोधात नाराजी

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यामुळे केवळ भारतासमोरील अडचणी वाढल्या आहेत असे नाही. एकीकडे ट्रम्प यांच्यामुळे जागतिक अर्थव्यवस्था अस्थिरतेला तोंड देते आहे तर ट्रम्प यांच्याविरोधात अमेरिकेतील जनतेतही नाराजी वाढते आहे. ट्रम्प यांच्या धोरणांविरोधात सध्या अमेरिकेतील अनेक शहरांमध्ये लोक रस्त्यावर उतरले आहेत.

**दुसऱ्यांदा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी निवडून आल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या कार्यशैलीने जगभरातील अनेक देशांसोबतच खुद्द अमेरिकेतील जनतेलाही काही धक्के दिले आहेत. देशांतर्गत धोरणांविषयीचेही अनेक कार्यकारी आदेश ट्रम्प यांनी आपल्या या कार्यकाळात जारी केले असून काँग्रेसने मंजूर केलेला निधीही त्यांनी रोखला आहे. अमेरिकेतील अनेक राज्यांच्या गव्हर्नरांचा विरोध असूनही ट्रम्प यांनी देशभरातील अनेक शहरांमध्ये नॅशनल गार्ड तैनात केले आहेत. अमेरिका संकटात असून अमेरिकेच्या पुनर्निर्माणासाठीच आपण सारे निर्णय घेत असल्याचा ट्रम्प यांचा दावा आहे. परंतु ट्रम्प यांचे काही निर्णय घटनाबाह्य असल्याची टीका आता अमेरिकेत होऊ लागली आहे. शनिवारी न्यूयॉर्क शहरातील टाइम्स स्क्वेअरमध्ये विरोधप्रदर्शन रॅलीमध्ये हजारो लोकांनी सहभाग घेतला. ट्रम्प प्रशासन आणि त्यांच्या कामकाजावर काही लोकांची प्रचंड नाराजी असल्याचे सांगितले जाते. ट्रम्प यांच्या कार्यशैलीचा जसा जागतिक अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम दिसतो आहे, तसेच त्यांच्या अमेरिकेशी संबंधित अनेक निर्णयांविरोधात तेथील जनतेमध्येही नाराजी दिसते. शनिवारी न्यूयॉर्क शहरात पाच ठिकाणी झालेल्या आंदोलनात सुमारे एक लाखाहून अधिक लोक सहभागी झाले. अर्थात ट्रम्प यांच्या सहकाऱ्यांनी या आंदोलनाला धुडकावून लावले असून त्याविरोधात 'दि हेट अमेरिका रॅली' अशा शब्दांत टीका केली आहे. न्यूयॉर्क शहरासोबतच राजधानी वॉशिंग्टन डीसी, शिकागो, मायामी आणि लॉस एंजेलिस यांसारख्या अमेरिकेतील अन्य शहरांतही लोकांनी आंदोलन पुकारले. याचवेळी युरोपातील काही देशांमध्येही अमेरिकेतील नागरिकांच्या समर्थनार्थ रॅली काढल्या गेल्या. अमेरिकेत यावेळी मोठा पोलिस बंदोबस्त होता. आंदोलनात लोकांच्या हातात 'लोकशाही हवी राजेशाही नव्हे' आणि 'संविधान पर्यायी नाही' अशा आशयाचे इंग्रजी घोषणाफलक होते. सर्व ठिकाणची आंदोलने शांततेत पार पडली आणि कोणालाही अटक झाली नाही. ट्रम्प प्रशासनाची कार्यशैली हा हुकुमशाहीच्या दिशेने जाणारा धोकादायक टप्पा वाटत असल्याची भावना काही आंदोलकांनी बोलून दाखवली. जगातील अनेक देशांवर ट्रम्प यांनी मोठ्या प्रमाणात कर लादले आहेत. यावर्षी २७ ऑगस्टनंतर अमेरिकेने भारतावर लावलेले ५० टक्क्यांचे आयातशुल्क लागू झाले असून त्याचे परिणाम देखील दिसत आहेत. गेल्या चार महिन्यांत अमेरिकेला होणाऱ्या भारताच्या निर्यातीत ४० टक्क्यांची घट झाली आहे. ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणाचा भारतावर सर्वाधिक परिणाम झाल्याचे सांगितले जाते. भारत आणि अमेरिकेदरम्यानच्या प्रस्तावित द्विपक्षीय व्यापार करारासंदर्भात गेले काही महिने चर्चेच्या फेऱ्या सुरू आहेत. अमेरिकेला कृषी व्यापारात काही सवलती हव्या असून त्याला भारताकडून विरोध केला जात असल्यामुळे ट्रम्प भारताला अडचणीत आणणारी विधाने करतात व दबाव आणण्यासाठी तशीच धोरणेही राबवत आहेत. नुकताच शुक्रवारी ट्रम्प यांनी पुन्हा असा दावा केला की भारत आता रशियाकडून कच्च्या तेलाची आयात करणार नाही. भारत-अमेरिका व्यापार करारासंदर्भात वाटाघाटी सुरू असल्यामुळेच ट्रम्प असे दावे करत असल्याचे तज्ज्ञ सांगतात. अमेरिकेतील जनतेच्या नाराजीनंतर तरी त्यांच्या कार्यशैलीत काही सकारात्मक बदल होतील का, हे येणारा काळच स्पष्ट करील.**

# नरक चतुर्दशीचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व





आश्विन कृष्ण पक्ष चतुर्दशीला नरक चतुर्दशी साजरी केली जाते. नरकासुर राक्षसाच्या वधाप्रीत्यर्थ हा दिवस साजरा केला जातो. यामागील कहाणी अशी आहे की नरकासुर नावाचा असुर मानवांना पीडा देत होता तेव्हा श्रीकृष्णाने त्याचा वध केला. मरताना नरकासुराने वर मागितला, की आजच्या तिथीला मंगल स्नान करणार्याला नरकाची पीडा होऊ नये. श्रीकृष्णाने त्याला वर दिला. त्यामुळे नरक चतुर्दशीच्या दिवशी सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान करण्याची रीत पडली. या दिवशी सूर्योदयापूर्वी उठून जे लोक स्नान करत नाहीत, वर्षभर त्यांच्या मागे दारिद्र्य आणि संकट पाठ सोडत नाही, असे मानले जाते. अभ्यंगस्नान चंद्रोदयव्यापिनी चतुर्दशीला सकाळीच लवकर उठून शरीरावर तेल आणि उटणे लावून स्नान करावे. त्यावेळी खालील मंत्र म्हणावा.

'यमलोकदर्शनाभावकामोऽअभ्यंगस्नान करिष्ये।'

अर्धी आंघोळ झल्यावर आंघोळ करणार्याला औक्षण करावे. या दिवशी गव्हाच्या पिठाचा एक दिवा तयार करून त्यात तिळाचे तेल टाकून, दिव्याच्या चारही बाजूला कापसाची वात लावून दिवा प्रज्वलित करावा. त्यानंतर पूर्वेला तोंड करून अक्षता आणि फुलांनी पूजा करावी. त्यासाठी खालील मंत्र बोलून देवालयात दिवा लावा.

संध्याकाळी घर, दुकान, कार्यालय आदी प्रज्वलित दिव्यांनी अलंकृत करा. हे व्रत केल्यावर नरकापासून मुक्ती मिळते. रामभक्त हनुमानाचा जन्म याच दिवशी झाला होता.

इतिहास - नरक चतुर्दशी - 'श्रीमद्भागवतपुराणात अशी एक कथा आहे - पूर्वी प्राग्ज्योतिषपूर येथे भौमासुर किंवा नरकासुर या नावाचा एक बलाढ्य असुर राज्य करत होता. देव आणि मानव यांना तो फार पीडा देऊ लागला. हा दुष्ट दैत्य स्त्रियांना पीडा देऊ लागला. त्याने जिंकून आणलेल्या सोळा सहस्र उपवर राजकन्यांना कारागृहात कोंडून ठेवले आणि त्यांच्याशी विवाह करण्याचा बेत केला. त्यामुळे जिकडेतिकडे हाहाःकार उडाला. श्रीकृष्णाला हे वृत्त समजताच सत्यभामेसह त्याने नरकासुरावर आक्रमण केले आणि त्याला ठार करून सर्व राजकन्यांना मुक्त केले. मरतांना नरकासुराने कृष्णाकडे वर मागितला, 'आजच्या तिथीला जो मंगलस्नान करील, त्याला नरकाची पीडा होऊ नये.' कृष्णाने तसा वर त्याला दिला. त्यामुळे आश्विन वद्य चतुर्दशी ही 'नरक चतुर्दशी' मानली जाऊ लागली आणि लोक त्या दिवशी सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान करू लागले. चतुर्दशीच्या पहाटे नरकासुरास ठार करून त्याच्या रक्ताचा टिळा कपाळास लावून श्रीकृष्ण घरी येताच मातांनी त्याला आलिंगन दिले. स्त्रियांनी दिवे ओवाळून आनंद व्यक्त केला.

आश्विन कृष्ण चतुर्दशीस नरक चतुर्दशी असे म्हणतात. दिवाळीच्या दिवसांतील हा एक सण आहे. या सणाशी संबंधित एक आख्यायिका प्रचलित आहे. नरकासुर नावाच्या एका राजाने तप करून ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतले व कुणाकडूनही वध होणार नाही - असा वर मागून घेतला. त्या वराच्या योगाने त्याने अनेक राजांना हरवून त्यांच्या कन्या व त्या राज्यांतील स्त्रियांचे अपहरण केले. नरकासुराने अश्या एकूण १६,१०० स्त्रियांना पळवून नेले व मणिपर्वतावर एक नगर वसवून त्यात त्यांना बंदी बनवून ठेवले. त्याने अगणित संपत्ती लुटली व अश्याच हावेपोटी त्याने देवमाता अदितीची कुंडले व वरुणाचे विशाल छत्रही बळकावले. त्याला मिळालेल्या वरामुळे तो देव, गंधर्व व मानवांना तापदायक झाला होता. अनेक गिरिदुर्गांनी वेढलेले प्राग्ज्योतिषपूर हे नगर त्याची राजधानी होती.

ही राजधानी अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या खंदकांनी अग्नी, पाणी इत्यादींनी वेढलेली होती. या दुर्जय राजधानीवर कृष्णाने गरुडावर स्वार होऊन चाल केली. कृष्णाने नरकासुराच्या देहाचे दोन तुकडे करत त्याचा वध केला. नरकासुरवधाने देवादिकांना, तसेच प्रजेला आनंद झाला. नरकासुराच्या बंदिवासातील कुमारिकांना त्यांचे स्वजन स्वीकारणार नाहीत, हे जाणून कृष्णाने या १६,१०० कन्यांसोबत विवाह केला व त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली. कृष्णाच्या पराक्रमाचे स्मरण म्हणून नरक चतुर्दशी साजरी करतात.(narak chaturdashi)

नरक चतुर्दशी महत्त्व -

आदल्या रात्री १२ वाजल्यापासूनच वातावरण दूषित लहरींनी युक्त असे बनू लागते; कारण या तिथीला ब्रह्मांडातील चंद्रनाडीचे सूर्यनाडीमध्ये स्थित्यंतर घडून येते. या स्थित्यंतराचा अपेक्षित असा लाभ पाताळातील वाईट शक्तींकडून उठवला जातो. पाताळातून प्रक्षेपित होणार्या नादयुक्त कंपन लहरी वातावरणात त्रासदायक अशा ध्वनीची निर्मिती करतात. या ध्वनीची निर्मिती लहरींतील रज-तमात्मक कणांच्या हालचालींतून उत्पन्न झालेल्या ऊर्जेतून केली जाते.

या लहरी विस्फुटित लहरींशी संबंधित असतात. या लहरींतील ध्वनीकंपनांना आवर घालण्यासाठी पहाटेच्या वेळी अभ्यंगस्नान करून तुपाचे दिवे लावून दीपाची मनोभावे पूजा करतात. यामुळे दीपातून प्रक्षेपित होणार्या तेजतत्त्वात्मक लहरींच्या माध्यमातून वातावरणातील त्रासदायक लहरींतील रज-तम कणांचे विघटन केले जाते.

या विघटनात्मक प्रक्रियेमुळे अनेक सूक्ष्म शक्तींच्या कोषांतील रज-तम कणही विरघळले जातात आणि वाईट शक्तींच्या भोवती असलेले संरक्षककवच नष्ट होण्यास साहाय्य होते. यालाच 'आसुरी शक्तींचा वातावरणात दिपाच्या साहाय्याने झालेला संहार' असे म्हणतात; म्हणून या दिवशी वाईट शक्तींचे निर्दालन करून पुढच्या शुभकार्याला दिपावलीच्या इतर दिवसांच्या माध्यमातून जिवाने आरंभ करावयाचा असतो. असुरांच्या संहाराचा दिवस, म्हणजेच एकप्रकारे नरकातील पृथ्वीवर अवतीर्ण झालेल्या वाईट लहरींच्या विघटनाचा दिवस म्हणून नरकचतुर्दशीला विशेष महत्त्व आहे.

सण साजरा करण्याची पद्धत

अ. आकाशात तारे असतांना ब्राह्ममुहूर्तावर अभ्यंगस्नान करतात. आघाडा या वनस्पतीच्या फांदीने डोक्यापासून पायापर्यंत आणि पुन्हा डोक्यापर्यंत पाणी प्रोक्षण करतात. यासाठी मूळ असलेली आघाडचाची वनस्पती वापरतात. नरकचतुर्दशीच्या दिवशी अलक्ष्मीचे पहाटे मर्दन करून आपल्यातील नरकरूपी पापवासनांचा नायनाट व अहंकाराचे उच्चाटन करायचे आहे. तेव्हाच आत्म्यावरील अहंचा पडदा दूर होऊन आत्मज्योत प्रकाशित होईल.

*(साभार : संत साहित्य)*




# व्हिडीओ कॉलसाठी आणलंय खास फीचर

इन्स्टंट मॅसेजिंग ॲप व्हॉट्सप आता आयुष्याचा एक महत्त्वापूर्ण भाग झाला आहे. कुटुंब, मित्रपरिवार असो की कार्यालयीन काम, प्रत्येक ठिकाणी व्हॉट्सपचा उपयोग केला जात आहे. युजर्सचा अनुभव आणखी चांगला व्हावा यासाठी कंपनी ॲपमध्ये सोईस्कर बदल करीत असते. आताही कंपनी व्हिडीओ कॉलिंगसंबंधीचे एक नवीन फीचर घेऊन आली आहे. त्यानुसार युजर्स व्हिडीओ कॉलदरम्यान लाईटची अनोखी सेटिंग करू शकणार आहेत.




नावाप्रमाणेच लो-लाइट मोडचा उद्देश कमी प्रकाशात कॉलदरम्यान व्हिडीओची गुणवत्ता वाढवणे हा आहे. या फीचरची चाचणी घेत असताना जाणवलं की, हे फीचर व्हिडीओ कॉलदरम्यान ब्राइटनेस सुधारेल, तुमचा चेहरा अधिक उजळ दिसेल आणि अंधारात व्हिडीओच्या स्पष्टतेमध्ये व्यत्यय आणणाऱ्या गोष्टी टाळण्यास मदत करील. म्हणजेच तुम्ही अंधारात व्हिडीओ कॉलदरम्यान तुमच्या मित्र व कुटुंबातील सदस्यांना पाहू शकतात.

व्हॉट्सपवर लो-लाइट मोड एनेबल कसं करायचं?

व्हॉट्सप उघडा. कोणत्या तरी व्यक्तीला व्हिडीओ कॉल करून पाहा. तुमचा व्हिडीओ फीड फूल स्क्रीन करा. त्यानंतर लो-लाइट मोड सक्रिय करण्यासाठी वरच्या उजव्या कोपऱ्यात असलेल्या 'बल्ब' चिन्हावर टॅप करा. फीचर डिसेबल करण्यासाठी फक्त बल्ब चिन्हावर पुन्हा टॅप करा.

वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवर लो-लाइट मोडबद्दलची माहिती

व्हेलिबिलिटी : लो-लाइट मोड हे फीचर आयओएस व ॲण्ड्रॉईड व्हर्जन अशा दोन्हीवर उपलब्ध असेल.

विंडोज ॲप : विंडोज पवर हे फीचर उपलब्ध नसेल. त्यामुळे तुम्हाला व्हिडीओ कॉलवर बोलताना ब्राईटनेस डजेस्ट करावा लागेल.

टेम्परी क्टिव्हेशन : लो-लाइट मोड प्रत्येक कॉलसाठी सुरू करावा लागतो, कारण सध्या याला कायम सक्षम ठेवण्याचा पर्याय अद्याप दिलेला नाही.

या नवीन लो-लाइट मोडच्या साह्याने युजर्सना कमी प्रकाशातही व्हिडीओ कॉलवर बोलणं सोपे होणार आहे. त्यामुळे पुढच्या वेळी तुम्ही कमी प्रकाशात असलेल्या खोलीत असाल तर हे उपयुक्त फीचर सक्रिय करायला विसरू नका, जेणेकरून अधिक व्यवस्थित व्हिडीओ कॉलचा अनुभव मिळू शकेल.

# मराठी लोकशाहीर अमर शेख



## निमित्त

अमर शेख ( ऑक्टोबर २०, १९१६ ते ऑगस्ट २९, १९६९) मूळ नाव मेहबूब हुसेन पटेल महाराष्ट्रातील एक नामवंत शाहीर होते. शाहीर अमर शेख हे ख्यातनाम मराठी लोकशाहीर होते. मेहबूब हुसेन पटेल हे त्यांचे मूळ नाव. आईचे नाव मुनेरबी. त्यांचा जन्म २० ऑक्टोबर १९१६ रोजी बार्शी येथे झाला. गरीब मुसलमान कुटुंबात जन्मलेल्या अमर शेख यांना विलक्षण पल्लेदार, पहाडी आवाजाची निसर्गदत्त देणगी तसेच मराठी लोकगीतांचा समृद्ध वारसा आईकडून लाभला होता.

गरिबीमुळे कधी बसचालकाबरोबर क्लीनर म्हणून, तर कधी गिरणी कामगार म्हणून त्यांना काम करावे लागले. गिरणी संपात पुढाकार घेतल्यामुळे त्यांना विसापूरच्या तुरुंगातही जावे लागले. तेथे भेटलेल्या कॉम्रेड रघुनाथ कर्हाडकर यांच्या प्रभावामुळे ते कम्युनिस्ट झाले. पोलिसांचा ससेमिरा चुकवत ते कोल्हापूरला आले व मास्टर विनायकांच्या स्टुडिओत काम करू लागले. येथेच त्यांच्या मित्रांनी 'अमर शेख' असे नामकरण केले. राष्ट्रीय चळवळीत ते १९३०-३२ च्या सुमारास सामील झाले.


आपल्या रचना रसाळपणे बुलंदआवाजात गात त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा यशस्वी प्रचार केला. स्वरचित आणि इतरांचीही कवने ते प्रभावीपणे पेश करीत. गोवामुक्ती आंदोलनातही त्यांनी मोठे योगदान दिले. चिनी व पाकिस्तानी आक्रमणांच्या वेळी आपल्या शाहिरीने त्यांनी लाखो रुपयांचा निधी देशासाठी गोळा केला. उपेक्षित समाजाच्या उद्धारासाठी वाणी, लेखणीचा यज्ञ त्यांनी मांडला. त्यांच्या शाहिरीत लावणी, पोवाडे, गीते, लोकनाट्ये इत्यादींचा समावेश होता.

जनसमुदायाला भारून टाकण्याचे प्रभावी अंगभूत कौशल्य त्यांच्याजवळ होते. त्यांची लेखणी जिवंत, ज्वलंत आणि हृदये प्रदीप्त करणारी होती. कवितेची अंतर्लय व रचना यमक प्रचुर करण्याची अमर शेख यांची प्रवृत्ती होती. रौद्र रसाचा आविष्कारही त्यांच्या काही कवनांतून त्यांनी घडविला.

त्यांच्या बर्याचशा रचना प्रासंगिक असल्या, तरी त्यांत विचारभावनांचे थरारते चैतन्य जाणवते. ते नुसतेच मनस्वी कवी नव्हते, तर जनस्वी लोकशाहीर होते. त्यांची कविता जनतेच्या ओठांवर रूजली, फुलली आणि ती लोकगंगेने जगविली. कविता हा या लोकशाहिराचा बहिःश्वर प्राण होता आणि सामान्यांतल्या सामान्याचे उत्थान हा त्यांच्या आत्म्याचा आवाज होता.

कलश आणि धरतीमाता (१९६३) हे त्यांचे काव्यसंग्रह, अमरगीत (१९५१) हा गीतसंग्रह आणि पहिला बळी (१९५१) हे त्यांनी लिहिलेले नाटक. त्यांनी रचलेल्या पोवाड्यांत छत्रपती शिवाजी महाराज, होळकर आणि उधमसिंग यांच्या पोवाड्यांचा समावेश आहे. युगदीप व वख्त की आवाज या मासिकांचे त्यांनी संपादन केले. प्रपंच आणि महात्मा जोतिबा फुले या चित्रपटांतून आणि झगडा या नाटकातून त्यांनी प्रभावी आणि ढंगदार भूमिका केल्या. लोककलांचे जतन, संवर्धन व संशोधन व्हावे तसेच शाहिरी व लोककलेचा वारसा वृद्धिंगत व्हावा या उद्देशाने मुंबई विद्यापीठात २००७ मध्ये त्यांच्या सन्मानार्थ 'शाहीर अमर शेख' अध्यासन सुरू करण्यात आले आहे. अशा या लोकप्रिय शाहिराचे २९ ऑगस्ट १९६९ रोजी निधन झाले. (साभार - इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# मोड आलेली मेथी किती प्रमाणात खावी?

आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर असलेली मोड आलेली मेथी आहारात प्रमुख स्थानी आहे. जिंदाल नेचरक्योर इन्स्टिट्यूटच्या मुख्य आहारतज्ञ सुषमा पीएस यांनी या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे. मोड आलेली मेथी हे आवश्यक जीवनसत्त्व, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्सच्या केंद्रस्थानी आहेत. तसेच हे व्हिटॅमिन-सी, ए ने समृद्ध असून जे आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी फायदेशीर आहे.



**पचनासाठी फायदेशीर**

मोड आलेल्या मेथीमधील उच्च फायबर सामग्री पचनास मदत करून आणि कफ रोखून निरोगी पचन तंत्राला चालना देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते.

**रक्तातील साखरेचे व्यवस्थापन**

मोड आलेली मेथी रक्तातील साखर नियंत्रित ठेवते. हे मधुमेह असलेल्या व्यक्तींसाठी फायदेशीर आहे.

**संरक्षण**

मोड आलेली मेथी अँटिऑक्सिडंट्स आणि अँटी-इंफ्लेमेटरी कंपाऊंडने परिपूर्ण असतात, जे संपूर्ण शरीरातील सूज कमी करण्यास फायदेशीर आणि विविध आरोग्य समस्या कमी करण्यासाठी योगदान ठरू शकते.

**हृदय-निरोगी आणि वजन नियंत्रणात ठेवते**

अंकुरीत मेथी कोलेस्ट्रॉलची क्षमता कमी करण्यास फायदेशीर ठरू शकते, जे हृदयविकारापासून बचाव करतात. तसेच कॅलरीज कमी आणि फायबर जास्त असल्यामुळे मोड आलेली मेथी परिपूर्णतेची भावना वाढवू शकते.

**रोगप्रतिकारशक्ती आणि हाडांसाठी फायदेशीर**

मोड आलेली मेथी शरीरात संरचना असलेले व्हिटॅमिन-सी तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते, मोड आलेल्या मेथीमध्ये फायटोएस्ट्रोजन गुण असतात, जे हार्मोनल समतोल राखतात. मोड आलेली मेथी हे कॅल्शियम आणि इतर खनिजांचे साधन आहेत, जे मजबूत हाडांसाठी फायदेशीर आहे.

**मोड आलेली मेथी खाण्यापूर्वी या गोष्टींची घ्या काळजी**

मोड आलेली मेथी खाण्याचे अनेक फायदे असले तरी मोड आलेली मेथी प्रत्येकासाठी फायदेशीर असू शकत नाही. आहारातील कोणताही बदल करण्यापूर्वी आहारतज्ज्ञांचा सल्ला घ्या.

गर्भवती महिलांनी तसेच ॲलर्जी असणाऱ्या व्यक्तींनीही मोड आलेल्या मेथीचे सेवन करण्यापूर्वी काळजी घ्यावी. याच्या अतिसेवनाने पोट फुगणे आणि गॅसची समस्या उद्भवू शकते.

# वाडगाव येथे दहा एकरवर साकारतेय 'माझे वन'

**अलिबाग : प्रतिनिधी**

अवैध जंगलतोड त्यात लागणारे वणवे यामुळे वनाची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे. जंगल, वने पुन्हा हरित करण्यासाठी अलिबाग वन विभागाने माझे वन उपक्रम राबवला आहे. विशेष म्हणजे शासनाचा एकही रुपया न घेता वन कर्मचारी, अधिकारी हे स्वखर्चाने दहा एकरवर ही लागवड करीत आहेत. असा स्तुत्य उपक्रम जिल्ह्यात राबवणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले आहे.



अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथे माझे वन उपक्रम कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी आदिती तटकरे यांच्या हस्ते माझे वनचे उद्घाटन करून वृक्ष लागवड करण्यात आली. या वनाला वरदाई वनराई असे नाव देण्यात आले आहे. उपवनसंरक्षक राहुल पाटील, सहाय्यक वन संरक्षक भाऊसाहेब जवरे, अलिबाग वन परिक्षेत्र अधिकारी नरेंद्र पाटील, सरिता भगत, वन अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते. वाडगाव येथे दहा एकरात विविध झाडाची लागवड केली आहे.

वनाची संपदा टिकवणे आपल्या हातात आहे. आजच्या पिढीला हे कळणे आवश्यक आहे. वन संपदेला हानी पोहोचल्याने वातावरणातही बदल घडत आहेत. त्यामुळे अलिबाग वन विभागाने सुरू केलेले माझे वन उपक्रम भविष्यासाठी लाभदायक ठरणार आहे. वाडगाव येथे केलेल्या माझे वन उपक्रमात आदिवासींना सामावून घेऊन लावलेल्या फळाच्या झाडाचे उत्पन्न त्यांना द्या अशा सूचना आदिती तटकरे यांनी केल्या. वणवे लागून वनाची हानी होत आहे. यावर कठोर पावले उचलणे आवश्यक आहे. वन विभागाने वणवे लावणाऱ्या वर कारवाईचा बडगा उचलावा अशा सूचनाही तटकरे यांनी केल्या आहेत.

झाडांसाठी लागणारे खत हे वरदाई चॅरिटेबल ट्रस्ट मार्फत दिले जाईल असे आश्वासन आदिती तटकरे यांनी दिले. जिल्ह्यातही हा उपक्रम राबवून राज्यात एक आदर्श निर्माण होऊ शकतो असा विश्वास त्यांनी बोलून दाखवला. आम्ही पदावर असे पर्यंत एक उत्तम काम करून जावे या दृष्टीने माझे वन ही संकल्पना राबवली. आम्ही गेल्यानंतरही आमच्या कार्यामुळे ओळख राहावी या दृष्टीने हा उपक्रम राबविला आहे. या उपक्रमाला अधिकारी, कर्मचारी यांनी साथ दिल्याने शक्य झाले असे मत उपवनसंरक्षक राहुल पाटील यांनी व्यक्त केले.

### नक्षत्र वन बनवा

***अलिबाग हे पर्यटन स्थळ आहे. लाखो पर्यटक अलिबागला भेट देतात. वन विभागातर्फे अलिबागमध्ये नक्षत्र वन बनवल्यास स्थानिक आणि पर्यटकांचे प्रेक्षणीय स्थळ निर्माण होऊ शकते. तसेच यातून उत्पन्न ही मिळून माझे वन उपक्रमाला हातभार लागू शकतो. त्यामुळे अलिबागेत नक्षत्र वन निर्माण करा अशा सूचना आदिती तटकरे यांनी वन अधिकाऱ्यांना केल्या आहेत.***

## कर्जत आणि माथेरान नगर परिषदेत कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदानाचे वाटप

**कर्जत : प्रतिनिधी**

दिवाळी सणाच्या निमित्ताने कर्जत नगर परिषदमधील अधिकारी, कर्मचारी यांना पालिकेच्या वतीने सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आले. माथेरान गिरीस्थान नगरपरिषदकडूनदेखील आपल्या अधिकारी आणि कर्मचारी वर्गाला सानुग्रह अनुदानाचे जाहीर केला आहे.

कर्जत आणि माथेरान या दोन्ही नगरपरिषदा मधील कर्मचाऱ्यांच्या खात्यात शनिवारी हे अनुदान जमा करण्यात आल्याची माहिती मुख्याधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

दिवाळी सणाच्या वेळी बोनस म्हणून सानुग्रह अनुदान देण्याची प्रथा आहे. कर्जत नगरपरिषद मधील कर्मचाऱ्यांना बोनस मिळावा यासाठी पालिका कर्मचारी संघटनेने मागणी केली होती. शनिवारी कर्जत नगरपरिषद मधील सर्व कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यात आले असून हे अनुदान कर्मचाऱ्यांना बंद खात्यात जमा झाले आहे, अशी माहिती पालिकेच्या वतीने देण्यात आली. त्यात कायम स्वरूपी तत्वावर असलेले सफाई कर्मचारी आणि कार्यालयीन कर्मचारी अशा ९१ अधिकारी कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यात आले.शुक्रवारी पालिका मुख्याधिकारी आणि प्रशासक तानाजी चव्हाण यांच्याकडून २५ हजाराची उचल सानुग्रह अनुदान म्हणून देण्याचा निर्णय घेण्यात आला आणि त्यानंतर शनिवारी बँक खात्यात जमा करण्यास सुरुवात झाली.

माथेरान गिरीस्थान नगरपरिषद मध्ये देखील ५८ कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यात आले. त्यात कायमस्वरूपी तत्वावर असलेले सफाई कर्मचारी आणि कार्यालयीन कर्मचारी यांना हे सानुग्रह अनुदान जाहीर करण्यात आले. पालिका मुख्याधिकारी आणि प्रशासक राहुल इंगळे यांनी हे अनुदान मंजूर केले.

## पर्यायी काँक्रीट रस्त्यांवर सुरक्षेचा अभाव! पथदिवे, संरक्षण कठडे आणि गतीरोधकांची नागरिकांकडून मागणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरातील वाढती वाहतूक आणि बाजारपेठेतील सततची कोंडी लक्षात घेऊन नगरपरिषदेने काही वर्षांपूर्वी शहरातील चारही पर्यायी मार्गांचे काँक्रीटीकरण केले. यामुळे पादचारी आणि दुचाकीस्वार यांना मुख्य रस्त्यावरील ताण टाळत सोयीस्कर पर्यायी मार्ग उपलब्ध झाले. मात्र, या पर्यायीवर अद्यापही सुरक्षेची मूलभूत साधने नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.



२०१८ साली पेशवे पाखाडी ते दादर पुल हा पहिला पर्यायी मार्ग काँक्रीट करण्यात आला. त्यानंतर गणेश आळी ते विठ्ठल आळी, टिळक रस्ता ते दादर पुल, आणि वाणी आळी ते कुंभारवाडा या तीन पर्यायी मार्गांचेही काँक्रीटीकरण पूर्ण झाले. सध्या हे चारही रस्ते नागरिक, दुचाकीस्वार आणि विद्यार्थी यांच्यासाठी प्रमुख पर्यायी मार्ग ठरत आहेत.

तथापि, चार ते पाच फूट उंचीच्या या रस्त्यांना संरक्षण कठडे बसवले गेले नाहीत. वळणदार रस्त्यांवर अनेकदा दुचाकी आणि रिक्षाचालकांचा वेग वाढल्याने किरकोळ अपघात होण्याची शक्यता कायम आहे. काही भागात रस्ता अरुंद असल्याने पादचारीही धोक्याच्या छायेत वावरत आहेत.

फक्त पेशवे पाखाडी ते दादर पुल या मार्गावरच पथदिवे बसवण्यात आले आहेत, तर इतर पर्यांवर रात्री अंधार दाटतो. त्यामुळे सायंकाळनंतर ये–जा करणाऱ्या नागरिकांना त्रास होत असून, विशेषतः विद्यार्थिनी आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. स्थानिक रहिवाशांनी नगरपरिषदेचे लक्ष वेधून सांगितले की, या चारही रस्त्यांवर संरक्षण कठडे, गतिरोधक आणि पथदिवे तातडीने बसवावेत. पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी ही तातडीची गरज आहे.नागरिकांच्या वाढत्या मागणीमुळे आता नगरपरिषदेने याबाबत त्वरीत पावले उचलावीत, अशी अपेक्षा शहरवासीयांनी व्यक्त केली आहे.

## नागोठणे परिसरात भातकापणीची लगबग; मजुरांची कमतरता, प्रतिव्यक्ती ५०० ते ६०० रुपये खर्च

**नागोठणे : बातमीदार**

दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखिल परतीच्या पावसाने शेतकऱ्यांचे भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. ऑक्टोबर महिना सुरु असून सुद्धा पावसाचा हाहाकार चालुच असून फक्त या चार ते पाच दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतलेली आहे. त्यामुळे संपूर्ण रोहा तालुक्यासह नागोठणे परिसरामध्ये शेतकऱ्यांची भातकापणीची लगबग मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.



परतीच्या पावसाने शेतातील भाताची रोपे ही जमिनीवर आडवी पडुन सर्वत्र विखुरल्यामुळे भातकापणी करताना मजुरांचे अक्षरशः कंबरडे मोडत आहेत. भातकापणी करताना शेतामध्ये पुन्हा नव्याने उगवलेले भाताचे कोंब देखिल अडथळे ठरत आहेत. ज्या ठिकाणी भातकापणीसाठी दोन ते तीन दिवस लागायचे त्या ठिकाणी भातकापणी करण्यासाठी आठ ते दहा दिवस लागत आहेत. त्यातच भातकापणीसाठी लागणा–या मजुरांची कमतरता भासत आहे.

बहुतांशी आदिवासी मंजुर हे दरवर्षी आप आपल्या शेतीची कामे पुर्ण करुन दुसरीकडे मजुरीसाठी जातात. पंरतु यावर्षी मात्र मात्र उशिरापर्यंत सुरू राहीलेल्या पावसामुळे भातकापणीची कामे ही सर्वांचीच एकदमच निघाल्यामुळे मजुरांची कमतरता मोठ्या प्रमाणात भासत आहे.

त्यातुनच जरी मजुरकर मिळाले तरी ५०० ते ६०० रु. एका माणसाची मजुरी, दोन वेळचे जेवण व चहा पाण्यासाठी आणखी वेगळे पैसे असा मोठ्या प्रमाणात खर्च शेतक–यांना करावा लागत आहे. त्यामुळे शेतीसाठी लागणारी बी –बीयाणे, मजुरांचा खर्च व परतीच्या पावसाचा बसलेला फटका अशा सर्व गोष्टींचा विचार करता यापुढे शेती करायची की नाही? असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे पडला आहे.


## दिपावलीनिमित्त रोह्यात खरेदीसाठी नागरिकांची झुंबड

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात दीपावली उत्सवाला सुरुवात झाली असून मोठ्या प्रमाणात कामानिमित्ताने बाहेर आलेले नागरिकाही आपल्या गावी दीपावली सण साजरा करण्यासाठी आले आहेत. दिपावली सणाच्या पार्श्वभूमीवर रोहा शहरातील बाजारपेठ सणासुदीच्या रोषणाईने उजळून निघाली आहे. शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात दिपावलीची लगबग सुरू असून खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी रोहा बाजारपेठेत दिसत आहे.

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील अनेक कारखान्यांमध्ये बोनस जाहीर झाल्यामुळे कामगार वर्गात आनंदाचे वातावरण असून, या आनंदाचे प्रतिबिंब रोहा बाजारपेठेत दिसून येत आहे.रोहा बाजारपेठेत विविध रंगांचे आकर्षक कंदील, सजावटीच्या वस्तू, फुलांची तोरणे आणि दिवे उपलब्ध झाले असून ग्राहकांची खरेदीची लगबग सुरू आहे.

दरवर्षीपेक्षा यंदा फटाक्यांच्या दुकानांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून मुलांची फटाके खरेदीसाठी झुंबड उडाली आहे.




## दिवाळीसाठी ऑनलाईन घरगुती फराळाला नागरिकांची पसंती

**पाली: प्रतिनिधी**

दिवाळीत कामाची लगबग, वेळेचा अभाव आणि इतर कारणांमुळे अनेकांना घरी फराळ बनवणे शक्य होत नाही. अशा वेळी रेडिमेड फराळाला पसंती असते. परिणामी दिवाळीत घरगुती फराळ विक्री सुरु झाली आहे. मात्र हा घरगुती फराळ घरबसल्या मागवून घरपोच मोफत मिळाला तर दुधात साखरच ! ऑनलाईन तसेच फेसबुक व व्हॉट्सअपद्वारे घरपोच घरगुती दिवाळी फराळ विक्रीस व आगाऊ बुकींगची सुरुवात झाली आहे. त्यामूळे नोकरदार महिलांसह अनेकांची दिवाळी अगदी सुखकर झाली आहे.

ऑनलाईन फराळ खरेदी व विक्रीचा ट्रेंड वाढला आहे. याबरोबरच इको फ्रेंडली व हॅन्डमेड गिफ्टना पसंती मिळत आहे. स्थानिक विक्रेते व महिलांना यातून नवे दालन व रोजगाराच्या संधी उभ्या राहत आहेत. धकाधकीच्या जिवनात सण–उत्सवाची तयारी करण्यासाठी अनेकांना वेळ नसतो. त्यात दिवाळीच्या फराळाची तयारी करणे म्हणजे दिव्यच झाले आहे. कित्येक वेळा चांगल्या दर्जाचा व परवडणाऱ्या किंमतीत फराळ मिळावा यासाठी बाजारात अनेक दुकानाच्या



पायऱ्या झिजवाव्या लागतात.

परंतू ऑनलाईन मार्केटिंगने हि समस्या मार्गी लावली आहे. फेसबुकवरील विविध पेजच्या माध्यमातून तसेच व्हॉट्सअपद्वारे घरगुती फराळ विक्रीसाठी जाहिरात व प्रसार होत आहे. त्यामुळे एका फोनवर, व्हॉट्सअप मेसेज, एसएमएस किंवा इमेलवर घरपोच उत्तम प्रतीचा फराळ उपलब्ध होणार आहे. या खरेदीतून ग्राहकांना काही आकर्षक ऑफर देखिल मिळत आहेत. त्यामुळे ऑनलाईन फराळ विक्रि व खरेदी मोठ्या प्रमाणात होणार असून बुकिंगला प्रतिसाद ही चांगला मिळत आहे. इतर वस्तुंबरोबरच आता फराळाने देखिल ऑनलाईन मार्केटवर प्रभाव निर्माण केला असल्याचे दिसत आहे.

फराळाचे फॅमिली पॅक उपलब्ध आहेत. यामध्ये चिवडा, चकल्या, लाडू, करंजी, शंकरपाळी, अनारसे आदी फराळाच्या जिन्नसांबरोबर चक्क उटणे, आकाश कंदील, आयुर्वेदिक तेल, साबण, पणत्या, चिरोटे, कंदील, रांगोळी व रांगोळी पुस्तक सुद्धा मिळत आहे. तसेच फराळाचा फॅमिली पॅक बरोबर चॉकलेट पॅक हि देखिल ऑफर आहेत. फराळाचा गिफ्ट पॅक सुद्धा अनेक ठिकाणी उपलब्ध आहे. छोटे स्टॉल व दुकानाबाहेर विक्रीसाठी देखील हे उपलब्ध आहेत.

दिवाळी निमित्त काही संस्थानी ऑनलाईन घरपोच फराळाची सोय केली आहे. विषेश म्हणजे त्यांनी महिला बचत गट, गृहउद्योग सक्षमीकरण व महिलांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने हे पाऊल उचलेले आहे. त्यांच्या मार्फत तयार केलेल्या फराळाच्या दर्जेदार वस्तू सोशल मीडियाच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत घरपोच पोहचवल्या जाणार आहेत. फेसबुक पेज व व्हॉट्सअप गृपचा विक्रेते आणि ग्राहकांना लाभ

वैयक्तीकपणे अगदी घरी तयार केलेल्या वस्तू तसेच छोट्या मोठ्या उद्योजकांच्या वस्तुंना मार्केट मिळावे यासाठी फेसबुकवर विविध पेज तयार करण्यात आले आहेत. युवा उदयोजक व उदयोजिका यांसारख्या फेसबुक पेजच्या माध्यमातून अनेक छोटो मोठे स्थानिक विक्रेते आपला माल विकत आहेत. तसेच अनेक ग्राहक देखिल या पेजला भेट देत आहेत. आपला माल किंवा वस्तू घरबसल्या खरेदी व विकण्यासाठी ऑनलाईन व सोशल मिडीया, व्हाट्सअप ग्रुप हे अतिशय प्रभावी माध्यम आणि साधन ठरत आहे. या माध्यमातून ग्राहकांनाही परवडणाऱ्या किंमतीमध्ये चांगल्या प्रतिच्या वस्तू अगदी मोफत घरपोच मिळत आहेत. तर विक्रेत्यांना जाहिरातीसाठी किंवा मार्केट मिळविण्यासाठी अधिक श्रम व पैसे मोजावे लागत नाहीत.

**मागील वर्षी आम्ही प्रायोगिक तत्वावर दिवाळीत गोउत्पादने व साबणांच्या नवीन व्यवसायाला सुरुवात केली होती. लोकांनी दिलेल्या प्रतिसादामुळे आम्ही पाणवठा नॅचरल हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड या नावाने कंपनी स्थापन करुन साबणांचे उत्पादन चालू केले आहे. यामध्ये ८ प्रकारचे साबण आहेत. तसेच अभिनेत्री ऐश्वर्या नारकर या ब्रँड ॲम्ब्यासिडर आहेत.**

**–गणराज जैन,**
**पाणवठा नॅचरल हेल्थकेअर प्रा.लि.**


## खरेदी जाहिरात

### ग्रुप ग्रामपंचायत कलोते, ता. खालापूर, जि. रायगड

ग्रामपंचायत कलोते हद्दीतील सन २०२४/२५ या वर्षातील १५ वा वित्त आयोग अंतर्गत प्लास्टिक कचरा कुंडी खरेदी करावयाच्या आहेत.त्याकरिता ग्रामपंचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि.२० ऑक्टोंबर २०२५ ते २७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ३.३० पर्यंत कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील. सदर निविदा दि. २७/१०/२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील.सदर निविदा २७ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता कार्यालयात उघडण्यात येतील किंवा ग्रामपंचायत ठरवेल त्या दिवशी. सदर कामांकरिता लागणारी इसारा रक्कम १ टक्का ग्रामपंचायत कलोते यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे/रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

| कामाचे नाव व योजना नाव | निधी | इसारा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|
| प्लास्टिक नीलकमल कचरा कुंडी व्हील सहित १२० लिटर क्षमतेच्या ६० कचरा कुंडी खरेदी करणे | निधी १५ वा वित्त आयोग सन २०२४/२५ रक्कम २,०००००/– | २०००/ | एक महिना |

**अटी व शर्ती**

१) निविदा भरणाऱ्या सर्व कंत्राटदारांनी दि.२०/१०/२०२५ ते दि.२७/१०/२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय येथे सिलबंद लिफाफा जमा करणे बंधनकारक आहे.
२) निविदा भरताना आपले दर जी.एस.टी. वगळून भरणे बंधनकारक आहे. जी.एस.टी. चे दर संबंधित विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.
३) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
४) मुदतीनंतर आलेल्या खाडाखोड करून साक्षांकित न केलेल्या व अटीशर्तीयुक्त निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
५) सदर निविदा अंदाजपत्रक निविदा व अटी शर्ती बाबत कार्यालयात निविदा धारकास माहितीपत्रक देण्यात येईल.
६) कोणत्याही नामंजूर निविदासंदर्भात निविदा धारकास कोणत्याही प्रकारे लेखी स्वरुपात कळविले जाणार नाही.
७) निविदा मंजूर झालेल्या ठेकेदाराला ५०० रु च्या बॉड पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.
८) निविदे सोवत १% इसारा रक्कम रोखीने ग्रामपंचायत मध्ये सामान्य पावतीने भरणा करावी.
९) ठेकेदार ग्रामपंचायतीचा थकबाकीदार बाकीदार असल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

**सही/–**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचयात कलोते**
**प्रशासक**



## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन – ४२१५०३, ता. अंबरनाथ जि.ठाणे.
ई–मेल: coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in, वेबसाइट: kbmc.gov.in.

**जा.क्र. : कुबनप/साबां/२२६९/२०२५** **दिनांक :– १७/१०/२०२५**

### जाहिर ई- निविदा सुचना क्र. ७६/२०२५-२६

कुळगांव–बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामाफत नगरपरिषद निधीतील ०१ विकास कामासाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई–निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई–निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि.२०/१०/२०२५ ते दि.२७/१०/२०२५ रोजी दुपारी. १२.०० वाजेपर्यंत असून दि. २४/१०/२०२५ रोजी दुपारी. १२.०० वा निविदा पुर्व बैठक नगरपरिषद कार्यालयात आयोजित केलेली आहे. तसेच सदरची ई–निविदा दि. २८/१०/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजल्यानंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in. तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/–**
**मुख्याधिकारी तथा**
**प्रशासक**
कुळगांव बदलापूर नगरपरिषद

## निवडक



### सुरक्षिततेसंदर्भात मार्गदर्शन

**पनवेल :** उरण वाहतूक शाखेकडून युइएस स्कूल उरण येथे शालेय परिवहन समितीच्या बैठकीस भेट देण्यात आली. या बैठकीस मुख्याध्यापक, पालक प्रतिनिधी, बस चालक व ऑपरेटर प्रतिनिधी, परिवहन प्रभारी शिक्षक तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्य उपस्थित होते. बैठकीदरम्यान उरण वाहतूक शाखेकडून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात आवश्यक त्या सूचना व मार्गदर्शन पो. उप.नि. उद्धव सोळंके यांनी केले. या वेळी शालेय बसची तांत्रिक तपासणी, चालकांची पात्रता व बसवरील सुरक्षा साधनांची (सीसीटीव्ही, जीपीएस, फर्स्ट एड बॉक्स इत्यादी) उपलब्धता तपासण्याबाबत विशेष निर्देश देण्यात आले. तसेच उपस्थित केलेल्या शंकांचे निराकरन करण्यात आले.

### सायबर सुरक्षा जनजागृती

**पनवेल :** १६ ऑक्टोबर रोजी पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील उच्च माध्यमिक शाळा, केळवणे, ता. पनवेल या ठिकाणी शाळेतील विद्यार्थी व त्यांचे पालक यांची सायबर सुरक्षा/ जनजागृती संदर्भात मीटिंग आयोजित करून सायबर सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सायबर गुन्हेगारी व सायबर सुरक्षा बाबतचे मानवी साखळीद्वारे जनजागृती करून प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये मोबाईल, इंटरनेट, ऑनलाइन शॉपिंग, फेक लिंक, इंस्टाग्राम फेसबुक फ्रॉड, मालवेअर, फोन पे, गुगल पे फ्रॉड, ऑनलाइन ट्रेडिंग फ्रॉड, डिजिटल अरेस्ट फ्रॉड, एनसीसीआरपी पोर्टल व हेल्पलाइन क्रमांक १९३० बाबत माहिती देण्यात आली. तसेच नवी मुंबईचे व्हाट्सअप व इंस्टाग्राम पेजची माहिती देण्यात आली. आयोजित सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाकरिता मुख्याध्यापक यांचेसह १२ शिक्षक ८० ते ९० विद्यार्थी उपस्थित होते.



### विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



**नवी मुंबई :** कौतिके चॅरिटेबल फाउंडेशन तर्फे हर मदद, एक नई उम्मीद या मोहिमेअंतर्गत उरण तालुक्यातील चिरनेर विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. उरण चिरनेर येथीलअनुदानित प्राथमिक आश्रमशाळेतील २२३ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. आरती बाळेकर व मंगेश खंदारे यांचे सहकार्य यावेळी लाभले. या उपक्रमांना फाउंडेशनचे सदस्य ज्ञानेश्वर जाधव, आशिष मिश्रा, अभिनय सिंग, निलेश कुटे, ओंकार गंधे, अभिषेक सिंग, वैभव जाधव, विजय जाधव, संतोष जाधव, जयश्री सुतार उपस्थित होते. उपक्रमाचा उद्देश म्हणजे शिक्षणासाठी झटणाऱ्या ग्रामीण व आदिवासी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या शिक्षणाला आवश्यक साहित्य पुरविणे हा आहे.

# दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा चोरांवर वॉच

## गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी विविध उपाययोजना

**पनवेल : वार्ताहर**

पोलिसांनी दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी विविध उपाययोजना केल्या आहेत. दिवाळी सणाच्या दिवसांत नागरिक मोठ्या प्रमाणात खरेदीसाठी बाजारपेठा, मॉल्स तसेच सोसायट्यांमध्ये गर्दी करत असल्याने या काळात घरफोडी, पाकीटमारी, सोनसाखळी चोरी तसेच सायबर फसवणुकीसारख्या गुन्ह्यांमध्ये वाढ होण्याची शक्यता असते. याच पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सर्वच पोलीस ठाण्यांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. तसेच या कालावधीत विशेष सुरक्षा उपाययोजना राबविण्याबाबत सूचित केले आहेत.

सोन साखळी चोरी, छेडछाड आणि ईव्ह टीझिंग या सारख्या गुन्हयांना प्रतिबंध घालण्यासाठी पोलिसांनी विशेष पथके तयार केली आहेत. सणासुदीच्या काळात बाजारपेठा, बँका, एटीएम सेंटर तसेच सोसायट्यांमध्ये वाढीव पोलीस गस्त घालण्यात येणार आहे. गुन्हेगारांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी साध्या वेशातील पोलीसही नियुक्त करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे महिला सुरक्षेसाठी निर्भया पथक आणि बीट मार्शल्स तैनात करण्यात आले असून गर्दीच्या ठिकाणी महिलांना मदत आणि त्वरित प्रतिसाद मिळावा, यासाठी विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे. प्रत्येक विभागात रात्रीच्या गस्तीसाठी स्वतंत्र पथके तयार करण्यात आली आहेत. दिवाळीच्या काळात बाजारपेठांमध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी नागरिकांची मोठी गर्दी होते. त्यामुळे वाहतूक कोंडी होते. या काळात वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून विशेष लक्ष देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे महिला कर्मचारीही देखील वाहतूक नियोजनासाठी तैनात ठेवण्यात येणार आहे. नवी मुंबई पोलीस नियंत्रण कक्षाने सीसीटीव्ही पोलीस

नेटवर्कद्वारे प्रमुख चौक, बस स्थानके, रेल्वे स्थानके आणि गर्दीची ठिकाणे यावर विशेष लक्ष ठेवण्याचे आदेश दिले आहेत. आकाशात उडविण्यात



येणाऱ्या कंदीलामुळे आगीचा धोका उद्भवण्याची शक्यता असल्याने तसेच समाजकंटकांकडून त्याचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पोलिसांनी सुरक्षा आणि संरक्षणाचा उपाय म्हणून दिवाळीमध्ये आकाशात कंदील उडवण्यावर आणि त्यांच्या विक्रीवर बंदी घातली आहे. दिवाळी साजरी करताना आवाजाची मर्यादा पाळण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही पोलिसांकडून देण्यात आला आहे. रात्री १० नंतर मोठ्या आवाजाचे फटाके फोडण्यास मनाई करण्यात आली आहे. दिवाळीच्या खरेदीदरम्यान ऑनलाईन फसवणुकीचे प्रमाण वाढ होत असते. त्यामुळे नागरिकांनी खोट्या ऑफर्स, ऑनलाईन गिफ्ट कुपन्स, बँक अपडेटचे फसवे कॉ ल्स किंवा मेसेजेसवर विश्वास ठेवू नये. नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. पोलिसांनी आपत्कालीन परिस्थितीसाठी ११२, वाहतूक हेल्पलाईनसाठी ७७३८३९३८३९, ज्येष्ठ नागरिक हेल्पलाईनसाठी १०९० आणि महिला हेल्पलाईनसाठी १०३ असे विविध हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध केले आहेत.

### नागरिकांना आवाहन

दिवाळीत अनेकजण बाहेरगावी जात असल्याने घरातील रोख रक्कम, दागिने चोरी होण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे या काळात विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. बाहेरगावी जात असल्याची माहिती जवळच्या पोलिस ठाण्याला देणे आवश्यक आहे. तसेच प्रवासादरम्यान सावधानता बाळगावी, असे आवाहन पनवेल पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी केले आहे.

*दिवाळीच्या काळात आनंद घेत असताना नागरिकांनी सावधगिरी बाळगावी. मोठ्या रक्कमेचे दागिने किंवा रोख रक्कम घेऊन बाहेर जाणे टाळावे. आकाशकंदील आणि फटाके फोडताना सुरक्षा नियमांचे पालन करावे, बाहेरगावी जाताना, दरवाजे आणि खिडक्या नीट बंद ठेवाव्यात. समाजातील शांतता, सलोखा आणि सुरक्षितता राखून दिवाळीचा सण साजरा करावा. संशयास्पद व्यक्ती किंवा वस्तू दिसल्यास त्वरित पोलिसांना कळवावे.*

***-नितीन ठाकरे,***
*वपोनि, पनवेल शहर पोलीस ठाणे*

# भेंडखळ चौकातील मार्गावर अपघाताची भिती

## तरुणाला कंटेनर ट्रेलरची धडक; सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील भेंडखळ चौकातील मार्गावर कंटेनर ट्रेलरने एका तरुणाला धडक दिल्याची घडली. या अपघातातून शुभम पाटील नामक तरुण अतिशय आश्चर्यकारकरित्या बचावला असला तरीही या घटनेनंतर पुन्हा एकदा नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न अधोरेखित झाला आहे. या वाढत्या अपघातांमुळे येथील अपघातांचे भय संपत नाही. अशी स्थिती निर्माण झाली आहे.

काही दिवसांपूर्वी उरण-पनवेल मार्गावरील गव्हाण फाटा येथे दुचाकीला अपघात होऊन मयुरेश म्हात्रे सुनील म्हात्रे या दोन तरुणांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर उरण व जेएनपीए परिसरातील अवजड वाहनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे. जेएनपीए प्रभावी क्षेत्रात दररोज दिवस - रात्र हजारो कंटेनर ट्रेलर व कार्गो वाहनांची वाहतूक सुरु आहे. या क्षेत्रात पूर्वीपासूनची हजारो लोकवस्तीची गावे असल्यामुळे येथील जनतेला याच भयानक वाहतुकीतून मार्ग काढत जावे लागते.



त्यामुळे अपघात होऊन अनेक निष्पाप नागरिकांना आपले जीव गमवावे लागले आहेत. तर कित्येक जखमी झाले आहेत मागील १५ वर्षात अनेक अपघात झाले आहेत. यात मुख्य मार्गासह अंतर्गत मार्गातही अपघातांचे प्रमाण वाढले आहे. उरणच्या द्रोणागिरी नोड तसेच खोपटे, दिघोडे मार्गावर अवैद्यरित्या उभी करण्यात येणारी अवजड वाहने यामुळे मार्ग अरुंद बनले आहेत. परिणामी स्थानिक प्रवासी व लहान वाहने यांचे अपघात अधिक वाढले आहेत.



**पनवेल : दिवाळीनिमित्त महापालिकेच्या मुख्यालय, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, प्रभाग कार्यालयांना विविध कार्यालये, चारही प्रभागातील चौक, रस्ते यांना आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.**

# उरणमध्ये पुन्हा वातानुकूलित एनएमएमटी बससेवा सुरू

**उरण : प्रतिनिधी**

नवीमुंबई महानगर पालिका परिवहन सेवेच्या एनएमएमटी व्यवस्थापनाने उरण - नवीमुंबई मार्गावर वाता नुकूलीत बस सुरु करण्याची मागणी प्रवाशांनी केली होती. या मागणीची दाखल घेऊन उरण ते कोपरखैरणे व उरण ते कलंबोली या दोन मार्गावर वातानुकुलीत बस सुरू करण्यात आली आहे. यामुळे ऑक्टोबर मध्ये अवकाळी पावसानंतर उकाड्याने त्रस्त झालेल्या प्रवाशांना दिलासा मिळत आहे.

उरण शहरात उरण ते नेरूळ, बेलापूर अशी लोकल रेल्वे सेवा सुरु झाली असली, तरी अनेक प्रवासी हे एनएम एमटी बसने सुरुवाती पासूनच प्रवास करीत आहेत. त्यामुळे या बससेवेच्या प्रवासी संख्येत वाढ होऊ लागली आहे, मात्र उरणमध्ये येणाऱ्या बस या आत्तापर्यंत जुन्या आणि नादुरुस्त होत्या. उरण येथून कोपरखैरणे कलंबोली अशा ३० व ३१ क्रमांकाच्या दोन बस या मार्गावर सुरु असून,येथील प्रवासी प्रवास करीत आहेत, मात्र या बसेसची दूरावस्था झालेली आहे.



या बसेसची अवस्था दयनीय असून, बसच्या काचा न लागणे, प्रवाशाला बसायला आसन नसणे, अशा समस्या आहेत. एनएमएमटी बससेवा ही उरण मधिल महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विशेषतः नवीमुंबई व मुंबई येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाची ठरत आहे. काही महिने बंद करण्यात आलेली ही बससेवा पूर्ववत करण्यात आली, मात्र बसची संख्या अपुरी असल्याने दैनंदिन प्रवाशांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

नवी मुंबईत प्रवास करण्यासाठी उरण ते कोपरखैरणे या मार्गांवरील ३१ क्रमांकाची तर कलंबोली ते उरण या मार्गावर ३० क्रमांकाची बस सुरु आहे. यामध्ये ३१ क्रमांकाच्या ३ व ३० क्रमांकाच्या मार्गासाठी ६ अशा एकूण ९ बस या मार्गावर दररोज चालत आहेत. यापूर्वी याच मार्गावर २५ पेक्षा अधिक बस सुरू होत्या तर या बसमधून दर दिवशी १५ हजार प्रवासी प्रवास करीत होते. सध्या नऊ बसमधून दिवसाला ६ हजार पेक्षा अधिक प्रवासी प्रवास करीत आहेत.

यामुळे उरण मधिल एनएमएमटी प्रवासी सेवा वाढू लागली आहे. भविष्यात प्रवासी संख्या वाढतच जाणार असल्याने दोन्ही मार्गांवरील बसेसच्या संख्येत वाढ करण्याची मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

# सुतिकागृह मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये विविध कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल मधील शंभर वर्ष जुने सुतिका गृह मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलमधील डॉ. सुजाता गायकवाड यांनी चार हजार यशस्वी नॉर्मल डिलिव्हरी करण्याचा टप्पा गाठला. त्यांच्या कर्तुत्वाचा सन्मान माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला.

हा सोहळा सुतिका गृह मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये शनिवारी आयोजित करण्यात आला होता. दरम्यान या कार्यक्रमाचे औचित्य साधून पत्रकार गणेश कोळी संपादित पनवेल टाइम्स या दिवाळी अंकाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. डॉ. सुजाता गायकवाड गेली २५ वर्षे सुतिका गृह मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल येथे कार्यरत आहेत. नॉर्मल डिलिव्हरी करण्यासाठी प्रसिद्ध असणाऱ्या डॉ. सुजाता गायकवाड यांचा पनवेल मधील अनेक सामाजिक संस्थांकडून सन्मान करण्यात आला आहे. या वेळी सुतिका गृहची समाजोपयोगी 'हिरकणी योजने' अंतर्गत असणाऱ्या नवीन वार्ड चे उदघाटनदेखील लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या योजनेंतर्गत नॉर्मल डिलिव्हरी १५ हजार रुपयात आणि सिझेरियन डिलिव्हरी ३० हजार रुपयात केली जाते. माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी डॉक्टरांचा सन्मान करताना सुतिका गृह सोबतच्या अनेक आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमावेळी पत्रकार गणेश कोळी, संजय कदम, पनवेल माता बाल संगोपन मंडळाचे मुख्य विश्वस्त विजय लोखंडे, हॉस्पिटलच्या संचालिका डॉ.अंजली लामतुरे उपस्थित होत्या.



# सफाई, सुरक्षा कर्मचारी व ज्येष्ठांना दिवाळी भेट!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रातील प्रख्यात दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रेरणेने येथील उलवे रहिवाशी संघटना व हनुमान मंदिर समितीच्या वतीने धनत्रयोदशीच्या शुभ मुहूर्तावर शनिवारी (दि.१८) उलवे रहिवाशी संघटनेचे अध्यक्ष अवधेशभाई महतो यांच्या वतीने हनुमान मंदिर समितीच्या प्रांगणात शानदार समारंभ आयोजीत करण्यात आला.

उलव्यातील सेक्टर १७ मधील हनुमान मंदिराच्या प्रांगणात झालेल्या समारंभात उलवे नोड -२ भाजपा अध्यक्ष सचिनशेठ घरत, वहाळ ग्रामपंचायत चे माजी उपसरपंच अमरशेठ म्हात्रे संघटनेचे पदाधिकारी उदय पांडे (उपाध्यक्ष), आवनीश सिंह (उपाध्यक्ष), सागर रंधवे, मीना भावसार, मंजू सिंह, देवालय मित्र, मनोज यादव, कपिल यादव, भरत गुप्ता, सुनील मौर्य व संतोष तुडमे उपस्थित होते. स्वच्छ व सुंदर उलव्यासाठी सतत योगदान देणारे सफाई कर्मचारी तसेच सुरक्षा कर्मचारी व ज्येष्ठ नागरिकांना दिवाळी निमित्त अध्यक्ष अवधेश महतो यांच्या निधीतून मिठाई, फराळ, थंड पेय व पणत्या इ. वस्तूंचा संच भेट देण्यात आला. या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी सचिनशेठ घरत, अमरशेठ म्हात्रे आदींच्या शुभहस्ते फराळ व भेटवस्तूंच्या संचाचे वितरण करण्यात आले. मान्यवरांच्या वतीने सर्व उपस्थितांना दिवाळीनिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.

या वेळी देवालय मित्र यांचे वतीने उजाला संस्थेच्या माध्यमातून अवधेश मेहता यांच्या उत्कृष्ट सामाजिक कार्याबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.





**पनवेल : सातारा येथील छत्रपती संभाजी महाराज गर्व्हनमेंट मेडीकल कॉलेजमध्ये शिक्षण घेण्यासाठी टीआयपीएलचे ॲडमीनीट्रेशन मॅनेजर सतिश उगले यांचे सुपूत्र प्रेम उगले हा जाणार आहे. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची सदीच्छा भेट घेऊन प्रेम उगले याने आशीर्वाद घेतले. या वेळी सर्वांनी प्रेमला पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. टीआयपीएलचे ॲडमीनीट्रेशन मॅनेजर सतिश उगले उपस्थित होते.**

# चारचाकी वाहन अपहारप्रकरणी गाडी हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

चारचाकी वाहन अपहार प्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी गाडी हस्तगत केली आहे. तर या संदर्भातील आरोपीचा शोध सुरु आहे.

वैभव काटकर यांची पाच लाख रुपये किमतीची एम एच १२ व्ही एफ ९३९२ मारुती सुझुकी कंपनीची डिझायर व्हीएक्सआय कार ही आरोपी ऋषिकेश जाधव याने स्वतःच्या ताब्यात घेऊन एक ते दीड तासात जाऊन येतो असे सांगून सदर गाडी घेऊन पसार झाला होता. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या पथकाने गाडीचा तपास केला. यात गुप्त बातमीदाराद्वारे सदर गाडी हे पनवेल शहरातील टपाल नका परिसरात उभी असल्याची महती मिळाली त्यानुसार या पथकाने सदर ठिकाणी जाऊन गाडी ताब्यात घेतली आहे. याबाबत फरार आरोपीचा शोध पनवेल शहर पोलीस करत आहेत.

# श्रीवर्धन तालुका पर्यटकांच्या प्रतीक्षेत

**श्रीवर्धन : बातमीदार**

यावर्षी मे महिन्यात सुरू झालेला पावसाळा व नंतर देखील ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत लांबलेला पावसाळा यामुळे पर्यटकांच्या संख्येमध्ये काही प्रमाणात घट झाली होती. यावेळी संपूर्ण महाराष्ट्रासह कोकणातही भरपूर पाऊस पडला. परंतु कोकणात पूरजन्य परिस्थिती कोठेही जाणवली नाही. मात्र पर्यटक तुरळक प्रमाणातच येत होते. दिवाळीला सुरुवात झालेली आहे. वसुबारस, धनतेरस व लक्ष्मीपूजन हे दिवाळीचे तीन दिवस आपल्या घरी साजरे केल्यानंतर लक्ष्मीपूजन झाले की, बलिप्रतिपदेच्या दिवशी पर्यटक खूप मोठ्या प्रमाणात फिरण्यासाठी बाहेर पडतात.



मुलांच्या शाळांना देखील सुट्टी पडलेली असते. त्यामुळे पुढील पंधरा दिवस पर्यटकांचा हंगाम चांगल्या प्रमाणात राहील अशी आशा पर्यटन व्यवसायिकांमधून व्यक्त केली जात आहे. २२ ऑक्टोबर पासून श्रीवर्धन तालुक्यातील सर्वच समुद्रकिनारे पर्यटकांनी फुलणार आहेत.

श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावरती करण्यात आलेले सुशोभीकरण हे पर्यटकांचे खूप मोठ्या प्रमाणावर आकर्षणाचे ठिकाण झाले आहे. या ठिकाणी असलेली कोळंबीची प्रतिकृती, खेकड्याची प्रतिकृती त्याचप्रमाणे एक होडी व मच्छीमार जोडपे तसेच या ठिकाणी बनवण्यात आलेले सेल्फी पॉईंट पर्यटकांचे विशेष आकर्षण ठरत आहेत.

श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावर असलेला सुशोभीकरण केलेला धूप प्रतिबंधक बंधारा देखील पर्यटकांना फिरण्यासाठी अत्यंत चांगले ठिकाण झाले आहे. मात्र यावर्षी लाटांच्या जोरदार माऱ्यामुळे धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावरून समुद्राकडे उतरण्यासाठी असलेल्या पायऱ्या व रॅम्प याचे काही प्रमाणात नुकसान झाल्यामुळे, नगरपरिषदेने त्या ठिकाणी असलेल्या पायऱ्यांच्या दुरुस्तीचे काम तातडीने हाती घ्यावे. अशी मागणी जोर धरत आहे.

श्रीवर्धन शहरापासून पाच किलोमीटर अंतरावर असणारा आरावी, कोंडविल समुद्रकिनारा देखील सध्या पर्यटकांच्या आकर्षणाचे ठिकाण बनले आहे. कारण या ठिकाणी असलेली चंदेरी रंगाची वाळू पर्यटकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे. त्याचबरोबर हरिहरेश्वर, दिवेआगर व आदगाव हे समुद्रकिनारे ही पर्यटकांसाठी सध्या बघण्याचे ठिकाण झाले आहेत. सर्व पर्यटन व्यावसायिक येणाऱ्या पर्यटकांच्या स्वागतासाठी सज्ज झालेले पाहायला मिळत आहेत.

## महाड शहरातील साडी सेंटरला आग; दोन तासाने आगीवर नियंत्रण

**महाड: प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील महाड बाजारपेठेतील भदेसर साडी सेंटर ला रात्री २ वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली असून आग आटोक्यात आणण्यासाठी महाड नगर परिषद अग्निशमन दलाचे शर्यतीचे प्रयत्न केले परंतु आगीने रुद्र रूप धारण केल्यामुळे आगीवर ती नियंत्रणात आणण्यासाठी जवळपास दोन तासाने आग नियंत्रणात आली. असे अग्निशामक दलाच्या जवानांनी सांगितले.




या आगीमुळे शेजारी असलेल्या दुकानाचे सुद्धा नुकसान झाले आहे. परंतु ही आग कशामुळे लागली हे अत्यावही समजले नसल्याचे बोलले जात आहे. दिवाळी सुरू असताना अचानक लागलेल्या आगीमुळे भदेसर साडी सेंटर चे मोठे नुकसान झाले आहे.



**तळा : विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या दृष्टीने तालुक्यातील अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्द येथे किल्ले तयार करणे या उपक्रम स्पर्धेत अंतर्गत नुकतेच विद्यार्थ्यांनी किल्ले प्रतापगड याची प्रतिकृती शाळेच्या प्रांगणामध्ये बनवली.**

## 'आई डे केअरचा' प्रेरणादायी उपक्रम

### दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कष्टातून उजळली दिवाळी

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील आई डे केअर संस्था संचलित मतिमंद दिव्यांग मुलांसाठी निवासी व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण केंद्र हे केवळ शिक्षण देणारे नव्हे तर स्वावलंबनाकडे वाटचाल घडवणारे एक प्रेरणादायी केंद्र ठरत आहे.



हिंदू संस्कृतीतील दिवाळी हा आनंद, प्रकाश आणि एकतेचा सण या सणाच्या निमित्ताने संस्थेतील विद्यार्थ्यांनी यावर्षी तब्बल ९० हजार पेक्षा अधिक पणत्या तयार केल्या. या पणत्या तयार करण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक, विश्वस्त, हितचिंतक, पालक आणि संपूर्ण मोहिते कुटुंब सर्वांनी मिळून तब्बल २५ दिवस अहोरात्र परिश्रम घेतले. झप्पी मार्फत मिळालेल्या जुडिओ मॉलच्या ७० हजार पणत्यांची ऑर्डर यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात विद्यार्थ्यांनी मोठी भूमिका बजावली. तसेच अनेक कंपन्या आणि स्थानिक नागरिकांनीही संस्थेला ऑर्डर देऊन प्रोत्साहन दिले.

या प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी कच्चा माल ट्रकमधून उतरवणे, पणत्या पाण्यातून काढणे, सुकवणे, रंगवणे, डिझाईन करणे, मेण गरम करणे, वाती बसवणे, मेण ओतणे, पॅकिंग करणे, ऑर्डर पोहोचवणे आणि स्टॉल लावणे ही सर्व कामे अत्यंत उत्साहाने केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढली, हायपरपणा कमी झाला आणि कामाबद्दल आत्मविश्वास निर्माण झाला. ते आता अधिक वेळ एकाच ठिकाणी बसून लक्षपूर्वक काम करू लागले आहेत. या पंधरा वर्षाच्या प्रगतीचे कारण त्यांचे विशेष शिक्षक आहेत.ज्यांनी याच मुलांचे डी.एड, बी.एड, एम.एड, केले आहे. बरेच पालक आहेत. ज्यांनी आपल्या मुलांसाठी या विशेष मुलांचे शिक्षण घेतले आहे.आमच्या संस्थेत ड्रॉइंग मध्ये मास्टर केलेल्या ज्योत्स्ना वारगुडे यांसारखे शिक्षक आहेत. जे मुलांना अत्यंत सुंदर कलाकृती कशा शिकवता येतील. आणि त्याला चांगले मार्केट कसे मिळेल. यासाठी सतत झटत असतात. सर्व विशेष शिक्षकांनी, मावशींनी रात्री संस्थेत राहून आणि हॉस्टेलमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी ही ऑर्डर कष्टाने पूर्ण केली.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पालकांनीही माझी शाळा म्हणजे माझीच जबाबदारी या भावनेने मदतीसाठी सहभाग घेतला. वंदना पवार, डॉ. समिधा गांधी, शशिकांत पवार, मनोज मेस्त्री, ज्योती मगदूम, सरोज राजेशिर्के,प्रकाश राजन, रवी ब्रिद, सतीश ब्रिद, जितेंद्र नाले, हेमंत खीरे,तसेच सर्व विशेष शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन संस्थेचे स्टॉल उत्कृष्टपणे सांभाळले. या यशामागे संस्थापिका स्वाती मोहिते, अध्यक्ष मुख्याध्यापिका प्रेमलता पाटील आणि चैताली प्रशिक्षण केंद्राच्या विद्या खराडे यांच्या मोठा वाटा आहे.

## महिला स्वयंसहाय्यता समूहांच्या फराळाला ग्राहकांची पसंती

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सध्या सर्वत्र दिवाळीची धामधूम चालू असून रायगड जिल्ह्यामध्ये जिल्ह्यातील महिला स्वयंसहाय्यता समूहांनी बनविलेल्या फराळाला खूप मोठ्या प्रमाणात मागणी आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले व प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे यांच्या संकल्पनेतून तालुका प्रभाग व ग्रामस्तरावर दिवाळीनिमित्त स्टॉल्स उभारण्यात आले असून जिल्ह्यात महिला स्वयंसहाय्यता समूहाने बनवलेल्या दिवाळी फराळ, सजावटीचे साहित्य,कंदील, पणत्या, सुगंधी उटणे यांना मोठ्या प्रमाणात मागणी आहे.




कोकण भवन येथे विभागीय आयुक्त कोकण विभाग डॉ.विजय सूर्यवंशी यांच्या शुभहस्ते या स्टॉलचे उद्घाटन झाले. याप्रसंगी कोकण भवन सीबीडी बेलापूर येथील सर्व अधिकारी वर्गाने आपल्या स्वयंसहाय्यता समूहांनी बनवलेल्या फराळाचा आस्वाद घेऊन मोठ्या प्रमाणात ऑर्डर दिली.

स्वयंसहाय्यता समूहातील महिलांना आत्मनिर्भर बनविण्याच्या दृष्टीने तसेच समूहांचे उत्पन्न वाढीस चालना मिळावी, यासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने राज्यस्तरावर मुंबई येथे मंत्रालय, कोकण भवन सीबीडी बेलापूर व उमेद कार्यालय येथे सुद्धा महिलांचे दिवाळी फराळाचे स्टॉल लावण्यात आले आहेत. या स्टॉलला खूप चांगला प्रतिसाद मिळाला आहे. यानिमित्ताने महिलांना घरगुती फराळाच्या ऑर्डर सुद्धा मोठ्या प्रमाणात प्राप्त होत आहेत. मंत्रालय प्रांगणामध्ये विविध अधिकारी व मंत्रिमंडळ यांनी स्टॉलला भेट दिली व महिलांना प्रोत्साहित केले.

जिल्ह्यातील प्रभाग संघ स्तरावर व पंचायत समिती प्रांगणामध्ये तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाच्या वतीने स्टॉलचे आयोजन करण्यात आले. येथेही मोठ्या प्रमाणात महिला स्वयंसहाय्यता समूहांना ग्राहकांचा, अधिकारी वर्गांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभला घरगुती चव व रुचकर पदार्थ यामुळे महिलांना दिवाळी सणानिमित्त मोठ्या प्रमाणात ऑर्डर्स मिळत आहेत जिल्ह्यातील २५७ स्वयंसहाय्यता समूहांनी यामध्ये सहभाग घेतला आहे.

## रायगड मेडिकल असोसिएशन तर्फे श्री धन्वंतरी पूजन

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

धनत्रयोदशी आणि श्री धन्वंतरी जयंतीनिमित्त रायगड मेडिकल असोसिएशन तर्फे कर्जत मेडिकल असोसिएशन आणि निमा कर्जत तालुका शाखे च्या संयुक्त विद्यमाने रॉयल गार्डन येथे श्री धन्वंतरी पूजन करण्यात आले.



या वेळी प्रास्ताविक करताना रायगड चे अध्यक्ष डॉ आशुतोष कुलकर्णी म्हणाले की देवाजवळ हीच प्रार्थना करतो की पुन्हा राज्य नको,स्वर्ग प्राप्ती नको, पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा लागला तरी चालेल पण माझ्या हातानी रुग्णांची सेवा होऊ दे, त्यांचे दुःख,रोग कमी करण्यासाठी शक्ती आम्हा सर्व डॉक्टरांना दे . ह्यावेळी निमा चे अध्यक्ष डॉ मिलिंद सोनावले ह्यांनी डॉक्टरांनी आपले स्वतःचे आरोग्य आधी जपावे असे आवाहन केले. तसेच डॉ श्रीकांत डहाके, डॉ नितीन भोपतराव, डॉ प्रभाकर काळे, डॉ जयश्री देशमुख यांनी देखील मार्गदर्शन केले. रायगड मेडिकल असोसिएशन चे सचिव डॉ प्रशांत गांगल यांनी सूत्रसंचालन केले तर रायकॉन चे कार्यकारी सचिव डॉ भावेश ओसवाल यांनी श्री धन्वंतरी स्तवन गायले.

## माणगावच्या शिक्षण प्रसारक मंडळाला स्वतंत्र विद्यापीठाचा दर्जा मिळवून देणार : अनिकेत तटकरे

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाने गेल्या काही वर्षांत शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रात घवघवीत यश मिळवले आहे. रायगड जिल्ह्यात कोठेही शैक्षणिक संस्थेचे स्वतंत्र विद्यापीठ नाही. मात्र या संस्थेला स्वतंत्र विद्यापीठाचा दर्जा मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा निर्धार माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी व्यक्त केला आहे.



माणगाव येथील दत्तात्रय तटकरे महाविद्यालयात त्यांच्या वाढदिवसानिमित्त मंडळाचे अध्यक्ष ड. राजीव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या सत्कार समारंभात ते बोलत होते. या शैक्षणिक संकुलाचा दर्जा वाढवून पुढील काही वर्षांत ते स्वतंत्र विद्यापीठाच्या स्वरूपात विकसित करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, आजच उच्च तंत्रशिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे फिजिओथेरपी कॉलेज पुढील शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे.

त्यांनी या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद दिला असून, पुढील वर्षी हे कॉलेज प्रत्यक्षात सुरू होईल. तसेच श्रीमती गीता दत्तात्रय तटकरे नर्सिंग कॉलेजमध्ये जे.एन.एम.सह विविध नर्सिंग कोर्सेस सुरू करण्यात येणार आहेत. यासाठी खासदार सुनील तटकरे आणि महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत.

या शैक्षणिक उपक्रमांमुळे माणगाव व परिसरातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी बाहेरगावी जाण्याची गरज भासणार नाही. माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उत्कृष्ट वातावरण उपलब्ध करून देत आहे. मी स्वतः या मंडळाचा एक विश्वस्त असून संस्थेचा पारदर्शक कारभार आणि शैक्षणिक गुणवत्ता हा अभिमानाचा विषय आहे, असे त्यांनी नमूद केले.

तटकरे म्हणाले, आज प्रथमच माझा वाढदिवस या संस्थेच्या माध्यमातून साजरा होत आहे. या निमित्ताने मला संस्थेचा आत्मीय सन्मान मिळाला. अध्यक्ष अॅड. राजीव साबळे आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

या प्रसंगी अध्यक्ष अॅड. राजीव साबळे, सेक्रेटरी कृष्णा भाई गांधी, स्कूल कमिटी चेअरमन नरेंद्र गायकवाड, संचालक नितीन बामगुडे, नर्सिंग कॉलेज संचालक औदुंबर गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर उभारे, प्राचार्य डॉ. खामकर, व मान्यवर उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी मंडळाच्या रंगावली प्रदर्शनाचा शुभारंभ

**कर्जत: प्रतिनिधी**

कर्जत शहरातील पाटील आळी मध्ये असलेल्या छत्रपती शिवाजी मंडळाचे हे पंचावन्नावे वर्ष आहे. या कालावधीत मंडळाने अनेक उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकीचा वारसा जपला आहे. गेल्या ४९ वर्षांपासून मंडळाच्या वतीने दीपावलीच्या दिवसांत रंगावली प्रर्शनाचे आयोजन करण्यात येते. यंदाचे हे ४९ वे वर्ष आहे. उदयोन्मुख कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळावे हाच मंडळाचा हेतू आहे. हे प्रदर्शन २६ ऑक्टोबर पर्यंत मोफत पाहण्यासाठी खुले आहे.



मंडळाच्या सभागृहात रंगावली प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. मंडळाचे माजी अध्यक्ष हरिभाऊ गुरव यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी मंडळाचे अध्यक्ष गजानन गुरव, माजी अध्यक्ष अशोक शिंदे, दत्तात्रय म्हसे, माजी खजिनदार विठ्ठल जाधव, किसन खंडोरी, सुनील परदेशी, राजन दगडे, हरिश्चंद्र राऊत, दिगंबर कांबळे, दीपक जाधव, बाळू दगडे आदी उपस्थित होते.

या प्रसंगी मार्गदर्शनपर मनोगतात अशोक शिंदे यांनी 'कर्जत मधील रंगावली कलाकार पुणे - मुंबई सारख्या मोठ्या शहरांमध्ये जाऊन आपल्या कलेचा ठसा उमटवतात ही कौतुकास्पद बाब आहे. गेल्या ४८ वर्षांचा या मंडळाचा इतिहास आहे. आपण आरंभशूर आहोत असे हिणवले जाते. मात्र आमचे मंडळ त्याला अपवाद आहे. याचा आदर्श इतरांनी ठेवणे गरजेचे आहे. कर्जत ही कलाकारांची खाण आहे. रंगवली प्रदर्शनाचे हे ४९ वर्ष आहे.' असें स्पष्ट केले.

## राजिपतर्फे आदर्श ग्रामसेवक पुरस्काराचे वितरण

**तळा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद अलिबाग मार्फत आदर्श ग्रामसेवक पुरस्कार वितरण सोहळा १७ ऑक्टोबर रोजी अलिबाग येथील क्षात्रेक्य समाज सभागृह कुरूळ, अलिबाग येथे आयोजित करण्यात आला होता.



ग्रामीण भागात शासनाच्या विविध योजनांची अंमल बजावणी यशस्वीपणे करून ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेचे राहणीमान उंचावण्यास व अडचणी सोडविण्यास सर्वतोपरी सहाय्य करणाऱ्या ग्रामसेवकांची आदर्श ग्रामसेवक म्हणून जिल्हा परिषद स्तरावर निवड करण्यात येते.

त्यानुसार तळा तालुक्यातील प्रचित प्रमोद मसाल यांना सन २०१६/२०१७ मधील ग्रामपंचायत उसर खुर्द व पढवण येथे केलेल्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल आदर्श ग्रामसेवक पुरस्काराने मुख्यकार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले आहे. प्रचित मसाल यांनी नेहमीच ग्रामपातळी स्तरावर ग्रामपंचायत क्षेत्रात त्यांनी नागरिकांना विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्यांना मिळालेल्या या पुरस्कारामुळे त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# महिला वर्ल्डकपमधील भारत-पाक सामन्याने मोडला प्रेक्षकसंख्येचा विक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सध्या सुरू असलेल्या महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्याने प्रेक्षकांचा एक नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. आयसीसीच्या माहितीनुसार ५ ऑक्टोबर रोजी कोलंबोमध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्याला २.८४ कोटी प्रेक्षक मिळाले आणि एकूण १८७ कोटी मिनिटांचा वॉच टाईम (पाहण्याचा वेळ) नोंदवला गेला. हा सामना आतापर्यंतचा सर्वाधिक पाहिला गेलेला महिला आंतरराष्ट्रीय सामना ठरला आहे.

आयसीसीने स्पष्ट केले आहे की, हा सामना प्रेक्षकांच्या संख्येच्या दृष्टीने सर्वोत्तम होता तसेच विश्वचषक लीग टप्प्याच्या पहिल्या सहामाहीत डिजिटल टीव्ही प्लॅटफॉर्मवर विक्रमी संख्या पहायला मिळाली. कोलंबो येथे झालेल्या या सामन्यात भारताने पाकिस्तानचा ८८ धावांनी पराभव केला होता.



भारत-पाकिस्तान सामन्याने महिला विश्वचषक इतिहासात लीग स्टेजमधील सर्वाधिक टीव्ही प्रेक्षकसंख्या गाठली. श्रीलंका, पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध भारताच्या सामन्यांसह पहिले ११ सामने एकूण ७२ दशलक्ष (७.२ कोटी) प्रेक्षकांनी पाहिले. २०२२च्या विश्वचषकाच्या तुलनेत टीव्ही प्रेक्षकांच्या संख्येत १६६ टक्के वाढ झाली आहे. या ११ सामन्यांमुळे एकूण ६.३ अब्ज मिनिटे पाहण्याचा वेळ निर्माण झाला.

२०२२च्या आवृत्तीच्या तुलनेत ही पाच पटीने मोठी वाढ आहे. पहिल्या १३ सामन्यांमध्ये एकूण सात अब्ज मिनिटे पाहण्याचा वेळ नोंदवला गेला, जो मागील स्पर्धेपेक्षा १२ पट जास्त आहे. आयसीसीच्या अहवालानुसार १२ ऑक्टोबर रोजी भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील सामन्याला जिओहॉटस्टारवर एकाच वेळी ४८ लाख प्रेक्षक होते. हा आकडा महिला क्रिकेटमध्ये एक नवा विक्रम आहे.

## विराटनंतर रोहितच्या नावावर 'हीट' कामगिरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पर्थच्या ऑप्टस स्टेडियमवर रविवारी भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळल्या जात असलेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात रोहित शर्माने एक इतिहास रचला आहे. या सामन्यासह रोहितने आपल्या कारकिर्दीतील ५०० वा आंतरराष्ट्रीय सामना खेळत भारतीय क्रिकेट इतिहासात एक नवा अध्याय लिहिला आहे.



रोहित शर्मा ५०० वा आंतरराष्ट्रीय सामना खेळणारा भारताचा पाचवा क्रिकेटपटू ठरला आहे. त्याच्यापूर्वी सचिन तेंडुलकर (६६४), विराट कोहली (५५१), एम एस धोनी (५३५) आणि राहुल द्रविड (५०४) यांनी ही कामगिरी केली आहे.

रोहित शर्माचा आंतरराष्ट्रीय प्रवास खूपच अविस्मरणीय राहिला आहे. २००७ मध्ये आयर्लंडविरुद्ध पदार्पण करणाऱ्या या धुरंधर फलंदाजाने आतापर्यंत भारतीय क्रिकेटला अनेक अविस्मरणीय क्षण दिले आहेत. कसोटी, एकदिवसीय आणि टी२० या तिन्ही फॉरमॅटमध्ये त्याचे योगदान महत्त्वाचे राहिले आहे.

## महेंद्रसिंह धोनीचा मोठा विक्रम कर्णधार गिलने केला नावावर

**मुंबई : प्रतिनिधी**

ऑस्ट्रेलिया विरूद्धच्या पहिल्या वनडे सामन्यात टीम इंडियाची कामगिरी निराशाजनक राहिली. या सामन्यात पावसाच्या व्यत्ययामुळे २६ षटकांचा सामना झाला. भारताने ९ गडी गमवून १३६ धावा केल्या. भारताची टॉप ऑर्डर पूर्णपणे फेल गेली.

शुबमन गिल या मालिकेपासून वनडे संघाची धुरा सांभाळत आहे. पण पहिल्याच सामन्यात काही खास करू शकला नाही. अवघ्या १० धावा करून बाद झाला. पण असं असूनही त्याने एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला.

शुबमन गिलने माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीचा विक्रम मोडला. तसेच भारतासाठी क्रिकेटच्या तिन्ही फॉर्मेटमध्ये कर्णधारपद भूषवणारा कमी वयाचा कर्णधार ठरला आहे. शुबमन गिलने २६ वर्षे आणि ४१ दिवसांचं असताना हा विक्रम आपल्या नावावर केला आहे. तर धोनीने यापूर्वी २६ वर्षे



आणि २७९ दिवसांचा असताना तिन्ही फॉर्मेटमध्ये कर्णधारपद भूषवलं होतं.

शुबमन गिल हा टी२० संघाचा रेग्युलर कर्णधार नाही. भारताने टी२० वर्ल्डकप जिंकल्यानंतर झिम्बाब्वे दौरा केला होता. तेव्हा शुबमन गिलकडे संघाची धुरा सोपवण्यात आली होती. त्यानंतर कर्णधारपद सूर्यकुमार यादवकडे देण्यात आलं. आता टी२० वर्ल्डकप २०२६ नंतर हे पद गिलकडे येईल असं सांगण्यात येत आहे.

## राष्ट्रीय पोलीस क्रीडा स्पर्धेत मयुरी खरातला रौप्यपदक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्रीनगर (जम्मू काश्मीर) येथे झालेल्या राष्ट्रीय पोलीस क्रीडा स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील रहिवासी आणि नवी मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेली तायक्वान्डोपटू मयुरी खरात हिने रौप्यपदक पटकावले.

पोलीस हेडक्वॉटर जम्मू आणि काश्मिर श्रीनगर, खेळ मंत्रालय भारत सरकार आणि तायकवांडो फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित पोलीस गेम्स राष्ट्रीय तायक्वान्डो स्पर्धा नुकतीच पोलो मैदान श्रीनगर येथे झाली. या स्पर्धेत रायगडची कन्या मयुरी खरातने आपल्या वेगवान खेळाने अंतिम फेरीत प्रवेश केला. तिथे तिला हार पत्करावी लागली, परंतु रौप्यपदक मिळाले.

मयुरी ही आंतरराष्ट्रीय पंच व सातवी डिग्री ब्लॅक बेल्ट असलेले सुभाष पाटील यांच्याकडे तसेच पोलीस प्रशिक्षक दादा माने यांच्याकडे तायक्वान्डो खेळाचे प्रशिक्षण घेत आहे. याआधी तिने विविध राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सुवर्णपदक मिळविले आहे. मयुरीला नुकत्याच मिळालेल्या यशामुळे नवी मुंबई पोलीस दलात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून आयुक्त मिलिंद भारांबे यांच्यासह अनेकांनी तिचे अभिनंदन केले.








## बांगलादेशकडून विंडीजचा पराभव

**ढाका : वृत्तसंस्था**

पहिल्या सामन्यात बांगलादेशने वेस्ट इंडिजचा दणदणीत पराभव केला. बांगलादेशने प्रथम फलंदाजी करताना ४९.४ षटकात २०७ धावा केल्या होत्या, पण वेस्ट इंडिजला धावांचा पाठलाग करणं काही जमलं नाही. वेस्ट इंडिजचा संपूर्ण संघ ३९ षटकं खेळत १३३ धावांवर बाद झाला. बांगलादेशने पहिल्या सामन्यात ७४ धावांनी विजय मिळवला.

या विजयासह तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत १-०ने आघाडी मिळवली आहे. या सामन्यातील विजयाची शिल्पकार ठरला तो रिशाद होसेन. त्याने भेदक गोलंदाजी करत ९ षटकात ३५ धावा देत निम्म्याहून अधिक संघ तंबूत पाठवला. त्याने ६ विकेट घेतल्या. वेस्ट इंडिजकडून ब्रँडन किंग आणि एलिक एथान्झे यांनी पहिल्या विकेटसठी ५१ धावांची भागीदारी केली होती. ब्रँडन किंगने ६० चेंडूत ४४ धावा केल्या. तर एलिक एथान्झेने २७ धावांची खेळी केली. त्यामुळे हा सामना वेस्ट इंडिजच्या हातात होता. मात्र त्यानंतर धडाधड विकेट पडत गेल्या. वेस्ट इंडिजचा डाव पत्त्याच्या बंगल्यासारखा कोसळला. सहा खेळाडू फक्त एकेरी धावांवर तंबूत गेले.

एकाला तर खातंही खोलता आलं नाही. कर्णधार शाई होप १५ आणि जस्टीन ग्रीव्हसने १२ दावा केल्या.दरम्यान, याआधी भारताने घरच्या मैदानावर विंडीजला कसोटी मालिकेत २-०ने धूळ चारली होती.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com